दैंनिक

# जनप्रभात

सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

* (आष्टी ) वर्धा * मंगळवार दि.०६/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २११ * पाने : ८ * किंगत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

## भाजपची मुंबईतून अयोध्येसाठी पहिली ट्रेन रवाना

**दैनिक जनप्रभात**

-------------

**मुंबई :** जय श्रीरामचे घोषणा देत मोठ्या भक्तिमय वातावरणात मुंबईहून 'आस्था ट्रेन' अयोध्येला आज सोमवारी (५ फेब्रुवारी) रवाना झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून आस्था ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. प्रवीण दरेकर, आ. मनीषा चौधरी उपस्थित होते. २४ मार्च पर्यंत 'मिशन अयोध्या' अभियान सुरू राहणार आहे.

## मोदींच्या पोस्टर्सला काळे फासणे भोवले, कुणाल राऊतला दोन दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक जनप्रभात**

-------------

**नागपूर :** काँग्रेसचे माजी मंत्री नितीन राऊत यांचे चिरंजीव आणि युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत याला नागपूर पोलिसांनी अटक केली असून नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पोस्टर्सला काळे लावल्याने आणि त्यांची भारत हा शब्द खोडल्याने केल्याने त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. यामुळे आता हा वाद वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. शनिवारी कुणाल राऊत याने आपल्या साथीदारांसह हे पंतप्रधान मोदींच्या फोटोला काळे फासले होते. त्यानंतर त्याने मोदी या शब्दावर भारत असेही स्टिकर लावले होते. युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत याने शनिवारी (ता. ०३ फेब्रुवारी) सायंकाळी नागपूर जिल्हा परिषदेत जाऊन 'मोदी की गॅरंटी' अशा आशयाच्या पोस्टर्सला काळे फासले. यावेळी त्याच्यासोबत त्याचे काही सहकारी सुद्धा उपस्थित होते. यानंतर त्याने मोदी या शब्दावर भारत असे स्टिकर लावून पोस्टर्सवरील नाव खोडले. या घडलेल्या प्रकाराची माहिती नागपूर पोलिसांना मिळताच त्यांनी कुणाल राऊत याला नोटीस बजावत पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिले. मात्र, कुणाल राऊत हा त्याच्या सहकाऱ्यांसोबत बेपत्ता झाला होता. यानंतर नागपूर शहरापासून ४० किमी लांब असलेल्या कुही या ठिकाणाहून नागपूर पोलिसांनी कुणाल राऊत याला ताब्यात घेत अटक केली. त्याच्यासोबतच पोलिसांनी अखिल भारतीय युवा काँग्रेसचे सरचिटणीस अजित सिंग यांनाही ताब्यात घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.

# अजित दादांकडून राज्यसभेसाठी पार्थ की बाबा?

**दैनिक जनप्रभात**

----------------

**मुबंई** – लोकसभेआधी राज्यसभेची निवडणूक जाहीर झाली आहे. देशभरातील राज्यसभेच्या ५६ जागांसाठी येत्या २७ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. यातील सहा जागा या महाराष्ट्रातील आहेत. या निवडणुकीत कोणता पक्ष बाजी मारणार याची चर्चा सुरु झाली आहे. मात्र राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतरची ही पहिली मोठी निवडणूक असल्यामुळे या फुटीचा फायदा कोणाला होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने या निवडणुकीत अल्पसंख्याक चेहरा देण्याचे निश्चित मानले जात आहे. अजित पवारांची मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन मजबूत नसल्याची खंत आहे. एकिकृत राष्ट्रवादी असल्यापासूनची त्यांची ही तक्रार आहे. समीर भुजबळ यांच्यासाथीला अल्पसंख्याक चेहरा दिल्यास मुंबईत राष्ट्रवादीसाठी अनुकूल वातावरण राहील अशी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ गोटात चर्चा सुरु आहे. काँग्रेसमधून राष्ट्रवादीत येऊ इच्छिणारे बाबा सिद्दीकी यांना राष्ट्रवादीकडून राज्यसभेचे तिकीट दिली जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवारही गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. लोकसभेतील पराभव पार्थ यांच्या जिव्हारी लागलेला आहे. त्यामुळे संसदेत जाण्याची ही संधी सोडायला पार्थ तयार नाहीत.बाबा सिद्दीकी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत. दोन वेळा नगरसेवक, तीन वेळा आमदार राहिलेले बाबा जियाउद्दीन सिद्दीकी हे मुंबईतील महापालिकेपासून विधानसभेचे राजकारण जवळून पाहिलेले अल्पसंख्याक नेते आहेत. आता त्यांचा मुलगा झिशान सिद्दीकीही काँग्रेसकडून आमदार आहे. मुंबईतील अल्पसंख्याक चेहरा सोबत असेल तर पक्षवाढीसाठी मदत होईल, हा अजित दादांचा कयास आहे. शरद पवार गटाकडे फौजिया खान, माजिद मेमन आणि लोकसभेत मोहम्मद फैजल सारखे चेहरे आहेत. मात्र अजित पवार गटाकडे अल्पसंख्याक नेत्यांची वाणवा आहे. आमदार नवाब मलिक यांनी अजित दादागटासोबत जवळीक साधली असली तरी त्यांच्यावर असलेल्या आरोपांमुळे नवाब मलिक हे अजित दादांसाठी 'असून अडचण, नसून खोळंबा' असे झाले आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर मुंबईतील सेलिब्रिटींपासून तळागळापर्यंत पोहोच असलेले बाबा सिद्दीकी हे राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठे 'ॲसेट' येत्या काळात ठरू शकणार आहे. पार्थ पवार यांना खासदार होण्याची इच्छा आहे. राज्यसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून त्यांच्या निकटवर्तीयांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार पार्थ पवार असतील अशी साखर पेरणी सुरु केली. मात्र राष्ट्रवादी फुटीनंतरच्या पहिल्याच निवडणुकीत मुलाला तिकीट दिल्यास अजित पवारांवर घराणेशाहीचा आरोप होण्याची शक्यता अधिक आहे. हा धोकाही अजित पवार ओळखून आहेत. त्यामुळे बाबा सिद्दीकी यांचे नाव राष्ट्रवादीकडून अंतिम असल्याचे अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांचे म्हणणे आहे.

## पार्टनर वाढले की खाती बदलतात
### महाजनांनी फडणवीसांसमोरच व्यक्त केली खंत

**दैनिक जनप्रभात**

-------------

**नागपूर :** आमच्याकडे मित्र वाढले, पार्टनर वाढले की, मग खाती बदलतात. त्यांच्या मागणीप्रमाणे खाती बदलतात. त्यामुळे ती मोठी अडचण झालेली आहे, असं मोठं विधान भाजपचे नेते मंत्री गिरीश महाजन यांनी केलं. तेसुद्धा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच. तेव्हा भाजपचे संकट मोचक म्हणून ओळख असलेले मंत्री गिरीश महाजन नाराज असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगत आहे. शिवसेनेत बंड करून सत्तेत सहभागी झालेले मुख्यमंत्र एकनाथ शिंदे यांच्या पाठोपाठ राष्ट्रवादीत बंड करून अजित पवारही त्यांच्या समर्थक आमदारांसह महायुतीत सहभागी झाले. भाजप सत्तेत जरी असले तरी त्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार गट आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्या समर्थक आमदारांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागत आहेत. यामुळेच भाजपमधील निष्ठावान लोकप्रतिनिधी कुठेतरी मागेच राहत असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगत असतानाच भाजपचे संकट मोचक आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती



असलेले मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांची खंत बोलून दाखवली.
काय म्हणाले मंत्री गिरीश महाजन? नागपुरात आयोजित कार्यक्रमात बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, इतक्या मोठ्या नावाजलेल्या कंपन्या नागपुरातील आहेत हे मलाही माहिती नव्हतं. पर्यटनाला इंडस्ट्री म्हणून बघितलं पाहिजे. पूर्वी राज्यांमध्ये आपण दोन नंबरवर होतो. आता नऊव्या, दहाव्या नंबरवर आहोत. आपल्यापुढे काश्मीर, केरळ, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश पुढे जात आहेत. विदर्भात फॉरेस्ट आहे. अनेक पर्यटनस्थळ आहेत. तरीसुद्धा आपण मागे आहोत याचा विचार करण्याची गरज आहे. माझ्याकडे ३ सेक्रेटरी बदललेले आहेत. त्यामुळे कसं काम करावं हे मला कळत नाही. तीन वर्षात तिसऱ्यांदा मंत्री झाले आहे. अडचणी भरपूर आहेत. अजून सात-आठ महिने हे खातं माझाकडे ठेवलं तर मला काहीतरी करता येईल, असं मला वाटतं, असं म्हणत गिरीश महाजन यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर नाराजी व्यक्त केली.मंत्री गिरीश महाजन यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच मंचावर गिरीश महाजन यांची तेथेच नाराजी दूर केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गिरीश महाजन तुम्ही चिंता करू नका. पुढच्या काळात तुमच्या खानदेशामध्ये सुद्धा हा कार्यक्रम नितीन गडकरी करतील.आता तुम्हीच कायमस्वरुपी पर्यटन मंत्री आहात. त्यामुळे तुम्हाला उत्तर महाराष्ट्रात, विदर्भात जिथे वाटते तिथे पर्यटन वाढवा. आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. असं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी गिरीश महाजन यांना दिलं.

# शिवरायांच्या आस्थेतून फिरला पाच महिने गडकिल्ले!
## सिंदी रेल्वेच्या युवकाचा सायकलने ६५०० किमींचा प्रवास

**दैनिक जनप्रभात**

-----------

**वर्धा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी मनात आस्था वाढली. त्यांनी बांधलेले गडकिल्ले पहावे, त्यांचा अभ्यास करावा असे सिंदी रेल्वेच्या एका युवकाने मनोमन ठरविले. गावातून २५ ऑगस्टला सायकलने निघाला. ६ हजार ५०० किलोमीटरचा प्रवास होता. सायकलने हा प्रवास नसल्याने अनेकांनी वेड्यात काढले. अडचणींची जाणीव करून दिली. त्याचा निग्रह ढळला नाही. शिवनेरी, रायगड, विशालगड, भुईकोट, नळदुर्ग, परांडा, औसा, उद्गीर अशा अनेकानेक किल्ल्यांचा पाच महिने अभ्यास करून हा युवक गावात परतला आहे. सूरज संतोषराव बांगडे हे या ध्येयवेड्या शिवप्रेमीचे नाव. सिंदी रेल्वेतून सायकलने निघालेला सूरज सर्वप्रथम अमरावती मार्गे चिखलदऱ्याला पोहचला. गाविलगडचा किल्ला पाहिला. पुढे सह्याद्रीच्या



कुशीत वसलेले हरीहरगड, ब्रह्मगिरी, विश्रामगड, रतनगड, मदनगड, साल्हेर, मुल्हेर, लोहागड, मल्हारगढ, कोरीगड, राजमाची, पुरंदर, सिंहगड, राजगड, तोरणा, शिवनेरी, तिकोना, हडसर तुंग, विसापूरला भेटी दिल्या. वाटेतील प्रत्येक जिल्ह्यातील पाच-सहा किल्ल्यांना सूरज भेट देत होता. सुमारे ६० किल्ल्यांवर ट्रेकिंग करून अभ्यासही केला. यात प्रामुख्याने कोकणातील सुवर्णदुर्ग, गोवागड, रत्नदुर्ग, विजयदुर्ग, जयदुर्ग, जंजिरा, कुलाबाचा समावेश आहे. यासोबतच कोकणातील करुण फोंडा घाट मार्गे कोल्हापुरातील पन्हाळा, पावनखिंड, ज्योतिबा, विशाळगड अनुभवले. सांगली, सोलापूर, लातूर, नांदेड मार्गे पुढे जात नळदुर्ग, परांडा, औसा, उद्गीरचे भुईकोट किल्ले पाहिले. शेवटच्या टप्यात माहुरगड, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर मार्गे रामटेक गाठून आपला गडकिल्ल्यांचा प्रवास संपविला.प्रवासादरम्यान रात्री जागा मिळेल तिथे एकटेच थांबायचे. कधी मंदिर, कधी टेंट तर गुहेतही थांबावे लागले. वन्यजीवांची भीती नेहमीची होती. शिवाजी महाराजांविषयीची आस्था मनात असल्याने या भीतीचा कुठलाही परिणाम झाला नाही. वाटेतील अनेकांनी शिवरायांचे कार्य सांगून उत्साह वाढविला. मदतही केली. या प्रवासातील अनुभवातून महाराजांचा इतिहास, कार्य भावी पिढीला पटवून देणार, अशी माहिती सूरज यांनी बोलताना दिली.

# व्याजाच्या पैशातून तरुणाला मारहाण



**दैनिक जनप्रभात**
**अतुल दंढारे/ प्रतिनिधी**

---------

**नरखेड ;-** तालुक्यातील पिंपळधरा येथील तरुण शेतकरी प्रवीण कोसरे याला व्याजानी घेतलेले पैसे वेळेवर परत न केल्यामुळे बेदम मारहाण करण्यात आली आहे. यात त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. पिंपळधरा येथील शेतकरी प्रवीण कोसरे याने वेळेवर पैसे परत न दिल्यामुळे आरोपींनी शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली आहे. त्यात दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले आहेत. असे असताना सुद्धा पोलिसांनी साधारण गुन्हे दाखल केले आहे. पिंपळदरा या गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुण शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा फायदा घेत नागपूर येथील प्रणय नितिन मालखेडे, उमेश बाबुराव बनाईत, ऋषभ प्रकाश निंबूरकर व हर्ष रमेश देशमुख सर्व राहणार नागपूर यांनी पिंपळधरा येथील तरुण शेतकरी प्रवीण कोसरे या शेतकऱ्यांना व्याजाने पैसे दिले ते पैसे जानेवारी च्या २७ तारखेला व्याजाचे पैसे परत करण्याचे ठरले होते. परंतु आरोपी २६ तारखेलाच व्याजाच्या पैशाची वसुली करायला आले आरोपींनी २६ जानेवारीला पिंपळधरा येथे येऊन रात्री ११ च्या सुमारास प्रवीण कोसरे ला पैसे मागितले व शिवीगाळ केली. सर्व आरोपी मद्य प्राशन करून होते तेंव्हा प्रवीण ह्याने उद्या पैसे देतो म्हणून सांगितल्यास आरोपीनी प्रवीणला बेदम मारहाण केली. त्यात विनोद बनसोड घरी झोपला होता त्याला वाद होत असल्याचा आवाज आला हो घराबाहेर आला असता त्याने मोबाईल चा टॉर्च लावला आरोपींनी त्याला तू व्हिडिओ रेकॉर्डिंग करत आहे का म्हणत त्याचा मोबाईल हिसकावला व तो फोडला व त्याला बेदम मारहाण केली. त्यात त्याला सुध्दा गंभीर दुखापत झाली. तसेच एका तरुणाच्या नाकाचे हाड फॅक्चर झाले आहे. आरोपी गावात १० टक्के व्याजाने कर्ज वितरित करतात असे सांगितल्या जात आहे. तसेच आरोपींनी खिशातील पैसे काढून घेतले. दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी प्रणय नितिन मालखेडे, उमेश बाबुराव बनाईत, ऋषभ प्रकाश निंबूरकर व हर्ष रमेश देशमुख चौघेही राहणार नागपूर यांच्या विरुद्ध कलम ३२४, ४२७, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास जलाल खेडा पोलिस करत आहे. फोटो ओळी. तरुणाला करण्यात आलेली बेदम मारहाण. नरखेड तालुक्यात अवैध सावकरकीचे प्रमाण वाढले. गेल्या काही वर्षापासून नागपूर जिल्ह्यात अवैध सावकारकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यात जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला. सावकार अवैध रित्या गावातील शेतकरी व तरुण वर्ग याना मोठ्या व्याजदराने तातडीने कर्ज देतात. पैसे वेळेवर परत न केल्यास शिवीगाळ, मारहाण व मानसिक छळ करता त्यामुळे काहीना यात आपला जीव गमवावा लागला आहे. यात शेतकरी व तरुण वर्ग बळी पडले आहे. सरकार याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे अवैध सावकार जोमात आपली सावकारकी करत आहे. सरकारने याकडे लक्ष न दिल्यास मोठ्या प्रमाणत शेतकरी व तरुण वर्गाला आपला जीव गमवावा लागणार आहे. पोलिसांनी सावकारकीचा गुन्हा का दाखल केला नाही. आरोपी १० टक्के व्याजाने कर्ज वाटप करत असतात व त्याची बळजबरीने वसुली करतात असे असताना त्या आरोपींवर सावकारकीचा व गंभीर दुखापतींचा गुन्हा दाखल का केला नाही असा प्रश्न विचारल्या जात आहे.

* प्रवीण कोसरे, विनोद बनसोड असे मारहाण करण्यात आलेल्या तरुणाचे नाव.
* पैसे वेळेवर परत न केल्यामुळे केली मारहाण
* व्याजाने घेतलेल्या पैशातून झाला वाद
* नागपूर जिल्ह्यात अवैध सावकारकी जोरात.
* पोलिसांच्या चौकशीवर प्रश्न चिन्ह.
* प्रणय नितिन मालखेडे, उमेश बाबुराव बनाईत, ऋषभ प्रकाश निंबूरकर व हर्ष रमेश देशमुख असे चारही आरोपीचे नाव.

## मराठा विद्या प्रसारक समाजाच्या पंचवार्षिक निवडणुकीत श्रीमंत डॉ. राजे मुधोजी भोंसले यांच्या नेतृत्वात शिवशाही पॅनलच्या दणदणीत विजय

**दैनिक जनप्रभात**
**दिलीप येवले / प्रतिनिधी**

-------------

**नागपूर, :-** विदर्भातील सर्वात जुनी संस्था असलेल्या मराठा विद्या प्रसारक समाजाची पंचवार्षिक निवडणूक दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी संपन्न झाली. या निवडणुकीत श्रीमंत डॉ. राजे मुधोजी भोंसले यांचे नेतृत्वात शिवशाही पॅनल, प्रदीप घोरपडे यांचे नेतृत्वात आदर्श पॅनल व मिलिंद साबळे यांचे नेतृत्वात सुराज्य पॅनल निवडणुकीच्या रिंगणात होते. संस्थेच्या आजिव सभासदांनी मोठ्या उत्साहात व विक्रमी मताधिक्याने श्रीमंत डॉ. राजे मुधोजी भोंसले यांचे नेतृत्वातील शिवशाही पॅनल मधील सर्वच्या सर्व १६ उमेदवार निवडून दिले.



१. श्रीमंत डॉ. राजे मुधोजी भोंसले अध्यक्ष , २.श्री प्रविण शिर्के कार्याध्यक्ष ३.श्री शिरीष राजेशिर्के उपाध्यक्ष, ४.श्री दिलीप सस्ते उपाध्यक्ष, ५.श्री राजेश काटे उपाध्यक्ष, ६.श्री निलेश चव्हाण कोषाध्यक्ष, ७.डॉ.प्रकाश मोहिते मुख्य सचिव, ८.श्री प्रशांत (बालू) भोसले सचिव, ९.श्री अनुप जाधव कार्यालयीन सचिव, १०.श्री नरेंद्र मोहिते सदस्य , ११.श्री महेंद्र (राजा) शिंदे सदस्य, १२.श्री अविनाश घोगले सदस्य, १३.सौ.अनिता जाधव सदस्या, १४.सौ.ममता भोसले सदस्या, १५.श्री सतीश मोहिते सदस्य, १६.श्री हरीश इंगळे सदस्य, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अँड. नितीन देशमुख यांनी कामकाज पाहिले.

# दिव्यांशूचा नरबळी दिल्याची दाट शक्यता

**दैनिक जनप्रभात**
**अतुल दंढारे**
**नरखेड प्रतिनिधी ( ता.५)**

---------

दिव्यांशू भिल्लम ३ वर्ष ६ महिन्याचा लहानसा मुलगा गुरवारी रात्री हरवतो व शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता जातो थांबतो भुकतो व परत येतो. त्यामुळे कुत्रा तिथं पर्यंतच का जातो ? तिथूनच परत का येतो? समोर का जात नाही ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. पोलिस म्हणतात त्या रस्त्यांनी जर तो मुलगा गेला तर आजू बाजू असलेल्या

* कुत्रा शेताच्या गेट पर्यंत जाऊन परत यायचा.
* मुलाचा बळी देऊन विहिरीत टाकल्याचा अंदाज.
* पोलिसांचा तपास संत गतीत.
* गावकरी घेणार पोलिस अधीक्षक यांची भेट.



त्याचा मृतदेह गावालगतच्या विहिरीत सापडतो. हा सर्व प्रकार मनला पटणारा नसून दिव्यांशूचा बळी घेतला असल्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. त्यात पोलिसांचा संत गतीने सुरू असलेला तपास त्यामुळे गावकऱ्यांचा संशय अधिक बळकट होत आहे. दिव्यांशू ज्या मार्गाने गेला त्या मार्गावर काही अंतरा पर्यंत कुत्रा



नागरिकांना तो का दिसला नाही.? मुलगा थोडे अंतर चालल्या नंतर गायब कसा झाला. जर तो विहिरीत पडून मरण पावला तर त्याचा मृतदेह पाण्यामुळे कडक का आला नाही. त्याचा मृतदेह विहरितून बाहेर काढला त्यावेळेस त्या मुलाचा मृतदेह लवचिक होता. तो मृतदेह पासून असे दिसत होते की तो झोपला आहे. त्याच्या डोळ्याजवळ हलके खरचडल्याची खून होती. विहिरीत पडला तर त्याला मार का लागला नाही. असे अनेक प्रश्न गावकरी व्यक्त करत आहे. नरबळीसाठी त्याला पकडले असावे व बळी घेतल्या नंतर त्याला विहिरीत फेकून दिले असावे असा संशय गावकऱ्यांनी व घरच्यांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे कोणत्याच मार्गांनी तो लहान मुलगा विहरीजवळ जाऊ शकत नाही. पोलिस संत गतीने तपास करत असल्यामुळे गावकरी पोलिस अधीक्षक नागपूर यांची भेट घेणार आहे.

**भाग ३**

*************

# संपादकीय .....

## सांस्कृतिक सारथ्याचा गौरव

लालकृष्ण किशनचंद अडवाणी यांना 'भारतरत्न' हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान घोषित झाल्याने भारदस्तता आणि भावनाप्रधानतेचा संयुक्त गौरव झाला आहे. अटलबिहारी वाजपेयी, नानाजी देशमुख यांच्यानंतर लालकृष्ण अडवाणी हे हा पुरस्कार मिळविणारे संघपरिवारातील तिसरे ज्येष्ठ नेते आहेत. आजवरच्या दीर्घ राजकीय प्रवासाने त्यांच्या झोळीत काहीशी स्वपक्षीय खंत आणि बरीचशी राजकीय अस्वस्थता टाकली आहे. लोकसभेत आकुंचन पावलेल्या तत्कालीन विरोधकांच्या सरशीचे सध्याच्या वैभवात रूपांतर करण्यामागे अडवाणींसारख्या ज्येष्ठ शिलेदारांचे अपरिमित परिश्रम आहेत. खरे तर, त्यांच्याकडे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींसारखे ना अमोघ वक्तृत्व आहे, ना विलक्षण काव्यप्रतिभा. समाजावर छाप उमटविण्याची ही कसर त्यांनी कल्पक उपक्रम आणि दमदार संपर्कक्षमेतेने भरून काढली. सहकारी नेत्याला काकणभर अधिक महत्त्व देऊन आजन्म दुय्यम भूमिका स्वीकारणे भल्याभल्यांना जमत नाही. अडवाणींच्या स्वभावात ती उदारता आहे. कसोटीच्या क्षणी वाजपेयींचे नाव सर्वोच्च पदासाठी सुचवून अंगभूत दिलेरीचा त्यांनी परिचय दिला. माध्यमांमध्ये कडवी प्रतिमा रंगविणे सुरू असताना अडवाणींनी मध्यममार्गी डौल जपला. शीर्षस्थ स्थानावर जाताना आकस्मिक बाजूला सारले गेल्यानंतर संघटनेबद्दलच्या कागाळ्या त्यांनी ओठी येऊ दिल्या नाहीत. स्पष्टवक्तेपणा मात्र कधीच सोडला नाही. त्यांची वर्तणूक सतत मर्यादाशील होती. सत्ताविहीनतेतून अनेकांचा लढाऊ बाणा क्षीण होत जातो. अडवाणी यांचा निग्रह मात्र सातत्याच्या प्रयत्नांमधून विरोधकांचे तळपणे कसे असते, हे सिद्ध करणारे आहे.अडवाणी यांचा जन्म कराचीतील. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लाहोर शाखेत जायचे. जन्मभूमीपासून विलग होण्याचे दुःख त्यांनी सोसले. शरणार्थी म्हणून स्वतंत्र भारताच्या हद्दीत आल्यानंतर त्यांनी आधीची व्याकूळता निग्रहात परावर्तित केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, भारतीय जनसंघाचे जबाबदार कार्यकर्ते, भारतीय जनता पक्षाचे सहसंस्थापक, प्रदीर्घ काळ विरोधी पक्षनेते आणि देशाचे उपपंतप्रधान अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी प्रभावी काम केले. आणीबाणीत त्यांनी कारावास भोगला. राम रथयात्रा, जनादेश यात्रा, स्वर्णजयंती रथयात्रा, भारत उदययात्रा, भारत सुरक्षायात्रा आणि जनचेतनायात्रा अशा वेगवेगळ्या माध्यमांद्वारे ते जनतेच्या थेट संपर्कात राहिले. रामजन्मभूमी आंदोलनाचा जननायक म्हणून त्यांचा अभूतपूर्व गौरव झाला. त्याच वेळी राजकारणात धर्माचा राजरोस शिरकाव त्यांच्या रथयात्रेमुळे झाला. भारतीय राजकारणाचा पोत तेथून बदलला. त्यांच्या पक्षाने पुढे ज्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा हिरिरीने पुरस्कार केला, त्या तत्त्वाचे अधिकृत आद्यसारथी अडवाणी होते. नियंत्रणविहीन कारसेवकांकडून अयोध्येतील बाबरी मशिदीचे पतन होताना ते असहाय आणि अगतिक दिसले. राम मंदिराच्या आंदोलनात डोळ्यांदेखत स्वयंनेतृत्वाची पकड सैल झाल्याचे शल्य त्यांना बोचत असेल. श्यामाप्रसाद मुखर्जींनी मोहम्मद अली जिनांसोबत स्थापन केलेल्या संयुक्त सरकारचा सोयीस्कर आठव भाजप विरोधकांनी वेळोवेळी केला आहे.

पाकिस्तानात जाऊन जिना यांच्या मजारीचे दर्शन घेणाऱ्या अडवाणींवर झालेली टीका तुलनेने मोठी होती. ते मात्र बधले नाहीत. स्वपक्षाचे अध्यक्षपद त्यांनी त्यातूनच गमावले. काही वर्षांतच पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून अडवाणींचाच चेहरा पुढे करण्याची वेळ भाजपवर आली. राजकारणातील सर्वोच्च संधीने त्यांना हुलकावणी दिली. हवाला घोटाळ्यात त्यांचे नाव येताच झटक्यात राजीनामा देण्याची नैतिकता त्यांनी दाखविली. न्यायालयीन लढाई जिंकल्याने त्यांच्यावरील काळजीचे ढग दूर झाले. स्पष्टता जपूनही राष्ट्रीय राजकारणातील स्नेह ही त्यांची जमेची बाजू आहे. वाजपेयींच्या लौकिकामुळे त्यांचे हे संचित झाकोळले गेले. 'गुजरात दंगलीनंतर वाजपेयींना नरेंद्र मोदींचा राजीनामा हवा होता,' या वाक्याचा पुनरुच्चार करण्यास अडवाणी कचरले नाहीत. राजकारणातील अनुभवाकडे दुर्लक्ष करून मोदी यांनी आणलेल्या वयोमर्यादेच्या अटीविषयीची नापसंती त्यांनी बोलून दाखविली. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यातील त्यांच्या अनुपस्थितीवरून विरोधकांनी भाजपला लक्ष्य केले.

# गानकोकिळा भुर्ररऽऽऽ उडाली तेव्हा...!

## सूरसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर चरणी श्रद्धासुमने विशेष

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील 'ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी!' हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञीं लताजींच्या पावन चरणी श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत... संपादक. लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना 'भारतीय गानकोकिळा' म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना 'लता दीदी' म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते.

लतादीदी मंगेशकरांचा जन्म मध्यप्रदेश- ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला.

लतादीदींनी ''नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी'' हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या ''किती हंसाल?'' या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना नवयुगच्या पहिली मंगळागौर या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी ''नटली चैत्राची नवलाई'' हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ- भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या 'आपकी सेवा में' या हिंदी चित्रपटासाठी 'पा लागूं कर जोरी' हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- 'बडी माँ'मध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी 'माता तेरे चरणों में' हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट 'महल'चे 'आयेगा आनेवाला' हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. गुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा 'शहीद' या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जींशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, ''येणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील.'' त्यांनी लताजींना 'मजबूर' या चित्रपटात 'दिल मेरा तोडा' हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली.

लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने ''फुले वेचिता'' या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय,मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता दुःखी कष्टी झाली. !! लतादीदींना व त्यांच्या अविस्मरणीय स्मृतींना श्रद्धांजली अर्पूण विनम्र अभिवादन !!


- संकलन व सुलेखन -

**श्री कृष्णकुमार आनंदी**

गोविंदा निकोडे गुरूजी.

मु. पो. ता. जि. गडचिरोली

फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.

इमेल

nikodekishnakumagmail.com


# दोन्ही स्वप्नांचा ताळा

आज जगावर दृष्टिक्षेप टाकला तर युरोपसहित अमेरिकेची अर्थव्यवस्था काहीशा धिम्या गतीने चालत आहेत. जपानसहित अनेक देशांनी गेल्या काही वर्षांमध्ये उणे विकासवाढ नोंदवली आहे. साऱ्या जगाच्या विकासाचे इंजिन समजल्या जाणाऱ्या चीनच्या अर्थवृद्धीचा वेगही बराच मंदावला आहे. अशा साऱ्या विपरीत परिस्थितीत आणि जगात अनेक ठिकाणी सशस्त्र संघर्षांना तोंड फुटले असताना भारताने इतका प्रचंड आत्मविश्वास का बाळगावा, असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो आहे.यंदा निवडणुका असल्याने पूर्ण अर्थसंकल्प नसेल. नवीन सरकार येणार असल्याने तो 'अंतरिम' असेल. मात्र, या केंद्र सरकारला पुन्हा सत्तेवर येण्याचा आत्मविश्वास असेल तर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारीला काही दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या तरतुदीही करू शकतात. अर्थातच, त्या तरतुदी मतपेट्यांना विसरून होणार नाहीत. सामान्यपणे मध्यम व उच्च मध्यमवर्गाचे लक्ष असणाऱ्या प्राप्तिकर विषयक तरतुदी किंवा करसवलतीसाठी वाढीव गुंतवणुकीची मुभा या बाबी अर्थमंत्री विचारात घेतात का, हे लवकरच कळेल. हे अंतरिम बजेट अशा प्रकारे समाधानाचे ठरणार की नाही, हे कळेलच. मात्र, या बजेटच्या आधी भारताच्या आर्थिक विकासाचे जे चित्र आर्थिक पाहणीतून समोर येते आहे, ते व्यापक समाधान देणारे आहे, हे निश्चित. आजवर आपण पाच ट्रिलियन म्हणजे पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहात होतो. यंदाच्या आर्थिक पाहणीने आता हे स्वप्न सन २०३० मध्ये सात लाख कोटी डॉलर इतके उंच नेऊन ठेवले आहे. त्या आधी म्हणजे २०२७ मध्ये पाच लाख कोटी डॉलरचे स्वप्न पुरे झालेले असेल. हा प्रचंड मोठा आकडा गाठताना भारताची अर्थव्यवस्था दरवर्षी किमान सात टक्के दराने वाढत राहील, असेही या पाहणीत म्हटले आहे. एप्रिलमध्ये नवे आर्थिक वर्ष सुरू होईल. या २०२४-२५ या वर्षात आर्थिक वाढीचा दर ७.१ टक्के असेल आणि पुढील अनेक वर्षे सातत्याने हा वेग कमी-अधिक प्रमाणात कायम राहील, असे या पाहणीत म्हटले आहे. पुढील पाच ते सहा वर्षे सात टक्क्यांचा वेग गृहित धरणे म्हणजे विक्रमी वाटचालीचे स्वप्न आहे. इतका प्रचंड वेग सातत्याने चीन वगळता एकाही देशाला अलीकडच्या काळात साधता आलेला नाही. भारताने तसा तो गाठला आणि राखला तर अर्थातच आनंदाची बाब आहे आणि या अर्थवृद्धीच्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना तसेच कल्याणकारी योजनांसाठी अधिक पैसा; ही दोन्ही उद्दिष्टे गाठता येतील. आज जगावर दृष्टिक्षेप टाकला तर युरोपसहित अमेरिकेची अर्थव्यवस्था काहीशा धिम्या गतीने चालत आहेत. जपानसहित अनेक देशांनी गेल्या काही वर्षांमध्ये उणे विकासवाढ नोंदवली आहे. साऱ्या जगाच्या विकासाचे इंजिन समजल्या जाणाऱ्या चीनच्या अर्थवृद्धीचा वेगही बराच मंदावला आहे. अशा साऱ्या विपरीत परिस्थितीत आणि जगात अनेक ठिकाणी सशस्त्र संघर्षांना तोंड फुटले असताना भारताने इतका प्रचंड आत्मविश्वास का बाळगावा, असा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो आहे. यावर या पाहणीतले आणि इतरही अनेक तज्ज्ञांनी आधीच सांगितलेले उत्तर म्हणजे भारतातली सातत्याने वाढत राहणारी देशांतर्गत मागणी, हे होय. भारतातील सतत वाढत राहणारा मध्यमवर्ग तसेच उच्च मध्यमवर्ग यांच्याकडून वाढत राहणारी मागणी, ही मागणी पुरविण्यासाठी उत्पादन तसेच सेवा उद्योगांना मिळणारी चालना आणि या साऱ्यातून जन्म घेणारे सुखचक्र.. असा हा अर्थतर्क आहे. तो बऱ्याच प्रमाणात वास्तव चित्रावर अवलंबून आहे. देशात बाहेरून येणारी तसेच देशांतर्गत होणारी गुंतवणूक, चलनवाढीवरचे नियंत्रण, देशातील कृषिक्षेत्राची कामगिरी आणि सेवाक्षेत्राला मिळालेला जबरदस्त वेग हे सारे निकष कायम राहिले तर हे सुखचक्र थांबणार किंवा मंदावणार नाही. मात्र, हे सारेच घटक आपल्या पूर्णपणे ताब्यात आहेत, असे समजणे योग्य होणार नाही.

**************

# पारदर्शक निवडणूक केव्हा? ईव्हीएमला आऊट करू तेव्हा!

## (भारतात निवडणूक प्रारंभ दिवस विशेष.)

पहिल्या निवडणुकीबाबत या गोष्टी खास होत्या- १) सन १९५१-५२ साली प्रत्येक मतदान केंद्रांसाठी स्वतंत्र बॅलेट पेपर बॉक्सची सुविधा उपलब्ध होती. २) मतदाराला कोणत्याही मतदान केंद्रावर आपलं मत बॉक्समध्ये टाकण्याचं स्वातंत्र्य होतं. ३) कोणत्याही उमेदवाराला मतं देण्याचं स्वातंत्र्य पहिल्या निवडणुकीत देण्यात आलं होतं. यासंबंधीची ज्ञानवर्धक माहिती देत आहेत श्री.एन. के.कुमार जी. ती वाचा व प्रगल्भ व्हा.. संपादक.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पद्धतीने सरकार स्थापन करण्यासाठी सन १९५१-५२ साली भारतात पहिल्यांदा निवडणूक घेण्यात आली. या प्रथम निवडणुकीस फेब्रुवारी महिन्यात सुरूवात झाली आणि ती तब्बल ४ महिन्यानी संपली होती. तेव्हा भारतात आतासारखे सोशल मीडिया, टीव्ही किंवा जाहिरातींचा सुळसुळाटही नव्हता. त्याकाळात ईव्हीएमसारखं तंत्रज्ञानही नव्हतं. त्यामुळं प्रचारसभा, वृत्तपत्र, फलक, पत्रक वाटून आणि प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रचार होत असे. स्वतंत्र भारतात त्या साली पहिली लोकसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत एकूण देशातील ५४ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. देशभरात १,८७४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते.

भारतीय संविधानाच्या भाग १५मध्ये अनुच्छेद ३२४ ते अनुच्छेद ३२९पर्यंत निर्वाचनाची व्याख्या केली आहे. त्यांत निर्वाचनांचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण हे निर्वाचन आयोगमध्ये निहित आहे, असे सांगितले आहे. तसेच निर्वाचन आयोगाला निवडणूक संपन्न करण्याची जबाबदारी दिली आहे. सन १९८९पर्यंत निर्वाचन आयोग केवळ एक सदस्यीय संगठन होते. परंतु दि.१६ अक्टोबर १९८९ रोजी राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे आणखी दोन निर्वाचन आयुक्तांची नियुक्ती केली गेली. सार्वजनिक पद धारण करण्यासाठी एक स्वतंत्र नेता निवडला जातो. ही एक औपचारिक निर्णय प्रक्रिया आहे. निवडणूक कधी कधी कार्यकारी अधिकारी, न्यायपालिका, प्रादेशिक आणि स्थानिक सरकारी यांसाठी घेतली जाते. विधिमंडळातील कार्यालये सदस्यांनी भरू शकतात. ही प्रक्रिया स्वयंसेवी संघटना, कंपन्या, क्लब, इतर अनेक खाजगी व व्यावसायिक संस्थामध्ये वापरली जाते. निवडणूक किंवा निर्वाचन- इलेक्शन ही लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे, ज्या द्वारे जनता आपल्या प्रतिनिधींना निवडते. निवडणूकांद्वारे आधुनिक लोकतंत्रचे लोक आमदार आणि कधी कधी न्यायपालिका आणि कार्यपालिका या विभिन्न पदांवर निवडून येण्यासाठी व्यक्तिंना निवडतात. यांद्वारे क्षेत्रीय आणि स्थानीय जागांसाठीही व्यक्तिंची निवड होते. वस्तुतः निवडणूकांचा प्रयोग व्यापक स्तरावर होत आहे आणि हे खाजगी संस्था, क्लब, विश्वविद्यालय, धार्मिक संस्था, इत्यादीमध्ये पण प्रयुक्त होत आहे. भारतीय लोकतंत्रात्मक निवडणूक प्रक्रियेचे वेगवेगळे स्तर आहेत. परंतु मुख्यत: संविधानात पूर्ण देशासाठी एक लोकसभा आणि वेगवेगळ्या राज्यांकरिता वेगळ्या विधानसभांचे प्रावधान आहे.

लोकसभेच्या एकूण ५४३ सीटांपैकी विभिन्न राज्यातील वेगवेगळ्या संख्येमध्ये प्रतिनिधी निवडले जातात. तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभांसाठीही वेगवेगळ्या संख्येमध्ये आमदार निवडले जातात. नगरीय निकाय निवडणुकांचे प्रबंध राज्य निर्वाचन आयोग करते. तर लोकसभा व विधानसभा निवडणुका भारत निर्वाचन आयोगाच्या नियंत्रणात होतात. ज्यात वयस्क मताधिकार प्राप्त मतदाता प्रत्यक्ष मतदानाद्वारे सांसद आणि आमदार निवडतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्हींचा कार्यकाल पाच वर्ष असतो. निवडणूकांसाठी सर्वात पहिले निर्वाचन आयोग अधिसूचना जारी करते. अधिसूचना जारी झाल्यावर संपूर्ण निर्वाचन प्रक्रियेचे तीन भाग- नामांकन, निर्वाचन आणि मतगणना असे होतात. निर्वाचनाची अधिसूचना जारी होताच नामांकन पत्र दाखल करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मिळतो. त्यानंतर एक दिवसाचा कालावधी हा त्यांच्या छानणीसाठी ठेवला जातो. यात अन्य अनेक कारणांनी नामांकन पत्र रद्द पण करतात. तत्पश्चात दोन दिवस नाव परत घेण्यासाठी दिले जातात. ज्याना निवडणूक लढवायची इच्छा नाही ते आवश्यक विचार विनिमयानंतर आपले नामांकन पत्र परत घेऊ शकतात. सन १९९३च्या विधानसभा आणि सन १९९६च्या लोकसभा निवडणुकांमध्ये विशिष्ट कारणांमुळे चार-चार दिवसांची मुदत दिली गेली. तथापि सामान्यत: हे कार्य दोन दिवसात संपन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. कधीकधी एखाद्या क्षेत्रात पुन्हा मतदानाची स्थिति निर्माण झाली. तर त्यासाठी वेगळा दिवस ठरवला जातो. मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची वेळ सामान्यत सकाळी ७ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ठेवली जाते.

इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन आल्यावर मतगणनेसाठी सामान्यत: एक दिवसाचा कालावधी ठेवला जातो. मतगणना सातत्याने चालू असते त्यासाठी विशिष्ट मतगणना केंद्र निश्चित करण्यात येते. या मतदान केंद्रांवर अनाधिकृत व्यक्तिंचा प्रवेश वर्जित असतो. सगळे प्रत्याशी, त्यांचे प्रतिनिधि आणि पत्रकार इत्यादींसाठी निर्वाचन अधिकाऱ्यांद्वारे प्रवेश पत्र दिले जातात. वर्तमान काळात निर्वाचन क्षेत्रानुसार मतगणना केली जाते आणि त्यासाठी तेथील सर्व मतदान केंद्रांवर मतांची गणना करून परिणाम घोषित केला जातो. परिणामानुसार ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले, तो पक्ष केंद्रात किंवा राज्यात आपले सरकार स्थापन करतो. भारतात मतदान करणे हे कायद्यानुसार अनिवार्य नाही. हा नागरिकांचा अधिकार आहे, कर्तव्य नव्हे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्य यांच्या निवडणूका प्रत्यक्ष न होता अप्रत्यक्ष स्वरूपात होतात. त्यांना जनतेने निवडून दिलेले जनप्रतिनिधीच निवडतात. निवडणूकांदरम्यान संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा निवडणूक आयोगाच्या नियंत्रणात कार्य करते. निवडणूकांची घोषणा झाल्यावर आचारसंहिता लागू होते आणि तिचे प्रत्येक राजकीय पक्ष, त्यांचे कार्यकर्ते आणि उमेदवार यांना पालन करावे लागते. आधुनिक प्रतिनिधी हे लोकशाही पद्धतीने निवडण्यासाठी एक साधन म्हणून निवडणुकीचा सार्वत्रिक वापर होतो. ईश्वर चिठ्ठीद्वारे सदस्यांची निवड करणे, हे तितकेसे विश्वसनीय वाटत नव्हते. म्हणून लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणुका या गुप्त मतदान पद्धतीने घेण्याचा निर्णय झाला. त्या काळात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट अर्थातच नव्हते. सन १९५१-५२मध्ये बॅलेट पेपर- मतपत्रिकेचा वापर करण्यात आला होता. मतपत्रिका ही मतपेटीत टाकण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर वेगवेगळ्या मतपेट्या ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही मतपेटीत आपलं मत टाकण्याचं स्वातंत्र्य मतदाराला देण्यात आलं होतं.

सांप्रतकाळी उमेदवार हा गर्भश्रीमंत असावा लागतो. कारण त्याला निवडणुकीस सारे घरदार विकावे लागते. का? तर प्रत्येक मत त्याला विकत घ्यावा लागतो. एकेका मताला तीनशे ते पाचशे रुपये मोजावे लागतात. जनता सुशिक्षित झाली, मात्र मतदार अधिक हावरा व आमिषाला बळी पडणारा झाला आहे. त्याला विकास करणारा नेता नको तर देश उजाडणारा हवा आहे. गुप्त मतदान पद्धती ही नावालाच राहिली आहे. आज आपले मत स्वमत न राहिल्यामुळे ते मत दान न होता मत क्रय-विक्रय सर्रास होताना दिसत आहे. दांडगाई करणाऱ्या उमेदवाराचे खुपच फावत आहे. याला आळा सुशिक्षित- सुजाण नागरिक नाही तर आणखी कोण घालणार? म्हणून आजच्या मतदारास लोकशाही नको तर हुकूमशाही अर्थात पारतंत्र्यच हवे आहे. पैसाआडका, लुगडे, धोतर, कापडचोपड, दारु व पार्टी घेतलेले मतदार विश्वासघात करत नाहीत, असा उमेदवारांचा ठाम विश्वास असतो. म्हणून ते खुप उधळपट्टी करतात. मात्र फुकटात विकासपुरुषास निवडून आणण्यासाठी मतदाराचे वाकडे पाऊल पडत नाही. काही सुजाण मतदार मात्र पैसे पेरणाऱ्यांकडून खुशाल फायदा उठवितात आणि जनकल्याण करणार्या निष्ठावान उमेदवारास आपले अमूल्य मत दान करून मतदानाचा हक्क बजावतात. पैसे पेरून देशाला खाईत लोटणाऱ्या देशद्रोही- बेगडी नेताजीस अशीच धूळ चारली पाहिजे, तरच आजचा सुशिक्षित तरुण भारताचा सुजाण नागरिक म्हणता येऊ शकेल. सन २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा बॅलेट पेपरचा वापर करण्यात यावा, अशी मागणी विरोधक व मतदारांकडून केली गेली. ईव्हीएममध्ये घोळ असल्याची विरोधकांकडून होणारी टीका आणि ईव्हीएमचा होणारा घोळ यामुळे पुन्हा एकदा यंदाही व्हीव्हीपॅट आणि बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी विरोधकांसह जागृत मतदार करत आहेत. मात्र पाषाण हृदयी निवडणूक आयोग ती मागणी धुडकावूनच लावत आहे, हे विशेष!

आज तंत्रज्ञानाच्या युगात सर्वकाही ऑनलाइन केले जात आहे. जसे की ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन मार्केटिंग, ऑनलाइन मागणी, ऑनलाइन देवदर्शन, ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन परीक्षा आदींप्रमाणे ऑनलाइन मतदान सुद्धा होणे काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वच निवडणूक घोटाळ्यांना टाळे लागेल, असाही एक मतप्रवाह दिसून येत आहे, तेही योग्यच म्हणा!


**श्री.एन. के.कुमार जी.**

**(से.नि. प्राथ.शिक्षक)**

**(भारताच्या वैभवशाली इतिहासाचे गाढे अभ्यासक व विश्लेषक.)**

**मु. पो. ता जि. गडचिरोली, पिन- ४४२६०५.**

**फक्त व्हॉट्सअॅप. ९४२३७१४८८३.**


## मिलन ..

साहित्य संमेलन
मेळा नव्हे मिलन
साहित्यिकरसीक
क्षुधातृप्त जीवन

सुखदाई हा सण
जगती सर्व जण
नुरे भेद भाव तो
जागती कणकण

साहित्य तारांगण
शारदेचे जागरण
रसीक चकोरास
होई अमृतप्रोक्षण

ग्रंथ दिंडी सजली
भोई होई आपण
ज्ञानियांचा राजा
संत करे निरूपण

पुस्तकाचा मळा
योगसे विलक्षण
ग्रंथविक्रीत वृध्दी
दाखवी सुलक्षण

परमात्मा निर्गुण
होतो इथे सगुण
रूप साहित्याचे
अंगी विविधगुण

माणूस सुसंस्कृत
हीचं सुरेख खूण
संमेलना निमित्ते
फेडू समाज ऋण

**हेमंत मुसरीफ पुणे.**

-----------

## व्यासपीठ..

प्रत्येक पक्ष चालवी
अधिकृत मुख पत्र
विचारांच्या लढाईचे
प्रभावशाली रे शस्त्र

तोफ डागते धडाडा
बदलून टाकते चित्र
खरे खुले व्यासपीठ
सर्व विषय चर्चासत्र

समस्यांचे समाधान
जवळचा वाटे मित्र
स्वकीय बांधून ठेवे
धागा ना मंगळसूत्र

बळ देते विस्तारास
विविधांगी एक सूत्र
संपादकीय पदांवरी
व्यक्ती निर्भयी पात्र

ड्रोनसमान लक्षवेधी
लक्ष लक्ष फिरे नेत्र
मुखपत्र लेखावरती
चर्चा नाव हो सर्वत्र

जबाबदारीने वापरा
शब्दशब्द हरेक सत्र
सामना रे संकटांशी
दाखल रे आरोपपत्र

संम्मेलन करी एकत्र
मुख पत्र सक्षम छत्र
पत्र नाही ते सन्मित्र
व्यापले सकल क्षेत्र


**हेमंत मुसरीफ पुणे.**

**९७३०३०६९९६**

www.kavyakusum.com

# माजी विद्यार्थ्यांच्या लघुउद्योगाला मॉडेलच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट.



**दैनिक जनप्रभात**
**कारंजा ( घा.) सिद्धार्थ सोमकुवर**
------------

स्थानिक कारंजा येथील संजीवनी टर्मरिक या लघु उद्योगाचे संचालक सुमित बनकर यांच्या लघुउद्योगाला मॉडेल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेट देऊन त्या अंतर्गत हळद या उत्पादनावर आधारित उद्योगाची माहिती जाणून घेतली.

कारंजा शहरात प्रथमच मिनिस्ट्री ऑफ फूड प्रोसेसिंग इंडस्ट्री तसेच प्रधानमंत्री फूड मायक्रोप्रोसेसिंग इंडस्ट्री अंतर्गत मॉडेल हायस्कूलचे माजी विद्यार्थी सुमित बनकर यांनी मागील एक वर्षापासून आपल्या शेतात हळद व मसाला प्रक्रिया उद्योग चालू केला आहे. त्यांच्याच शेतात उत्पादित झालेल्या व पारंपारिक पद्धतीने बनवण्यात आलेले मसाले व हळद यावर प्रक्रिया करून आणि पॅकेजिंग करून ग्राहकांना उपलब्ध केलेले आहेत.

सुमित बनकर यांनी आपल्या शेतातील उत्पादनावर आधारित लघुउद्योग स्थापन करून स्वतः स्वयंरोजगार मिळवून इतरांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

दिनांक २ फरवरी रोजी मॉडेल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत सुमित बनकर यांच्या लघु उद्योगाला भेट देऊन सदर लघु उद्योगाची माहिती समजून घेतली. विद्यार्थ्यांनी सुमित बनकर यांची मुलाखत घेतली. त्यांच्या मुलाखती मधून विद्यार्थ्यांना उद्योगाची स्थापना, प्रक्रिया, पॅकेजिंग व मार्केटिंग संबंधीचे विशेष ज्ञान प्राप्त झाले.

पारंपारिक पद्धतीने तयार केलेली हळद ही आरोग्यवर्धनाकरता उपयोगी असते असे यावेळी सुमित बनकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी मॉडेल हायस्कूलच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांनी संजीवनी टर्मरिकचे संचालक सुमित बनकर व त्यांचे वडील यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी शाळेचे शिक्षक विनोद चाफले, शिक्षिका शिरखेडकर व सुरडकर उपस्थित होत्या.




## सर्वांगीण ग्रामीण विकास प्रकल्पाच्या सहाय्याने पारंपारिक शाळा बनल्या स्मार्ट शाळा

### तहसीलदार ऐश्वर्या गिरी व गट विकास अधिकारी हस्ते माळेगाव (काळी) येथील स्मार्ट स्कूल चे अनावरण



**दैनिक जनप्रभात**
**कारंजा सिद्धार्थ सोमकुवर**
---------

आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया, एच डी एफ सी (कृक्रऊ) बँक उडठ डरे समर्थित सर्वांगीण ग्रामीण विकास कार्यक्रम अंतर्गत पारंपारिक जिल्हा परिषद शाळांना स्मार्ट स्कूल मध्ये रुपांतर करून माळेगाव (काळी) येथील स्मार्ट स्कूल चे येथील एका जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात आला. ह्या उपक्रमाअंतर्गत शाळेमध्ये पाणी फिल्टर आणि पाणी कूलर, मुला-मुलींची स्वच्छतागृह, पुस्तकालयाचे कपाट व क्रीयाकल्प, डीजीटल बोर्ड (खपींशॲरलीं‌ळींश झरपपशश्र), बोलक्या भिंती (रंगरंगोटी), तसेच ईतर दुसुरस्तींचे कामे करण्यात आली. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटक मा. प्रवीण देशमुख साहेब (गटविकास अधिकारी कारंजा



गटविकास अधिकारी कारंजा (घाडगे) यांच्या हस्ते अनावरण दिनांक ०३/०१/२०२४ ला करण्यात आले. आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया, संस्था मागील २ वर्षापासून वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घाडगे) तालुक्यातील ९ गावांमध्ये तर आर्वी तालुक्यातील ६ गावांमध्ये ग्रामविकासाची वेगवेगळी कामे करीत आहे. त्याच कामांपैकी स्मार्ट स्कूल हा देखील उपक्रम मागील ३ महिन्यांपासून राबवीत आहे. हा उपक्रम कारंजा तालुक्यातील ३ गावातील (माळेगाव काळी, सेलगाव उमाटे आणि उमरी) तर आर्वी तालुक्यातील बोथली (हेटी) (घाडगे), कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. ऐश्वर्या गिरी मॅडम (तहसीलदार, कारंजा (घाडगे), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. पवन डोंगरे सर (व्यवस्थापक HDFC CSR परिवर्तन), मा. चंद्रशेखर आत्राम (माजी सभापती प.स. कारंजा (घाडगे), सौ. सविताताई सुरेश कालोकर (सरपंच माळेगाव (काळी), मा. लीलाधर बन्नगरे सर (मुख्याध्यापक जि.प. शाळा माळेगाव), मा. विजय काकडे (प्रकल्प व्यवस्थापक, AKAH, कारंजा (घाडगे) तसेच शाळेतील शिक्षक व विद्यार्थी आणि AKAH चे अधिकारी कार्यक्रमाला उपस्थित होते.

## ग्रुप ग्रामपंचायत टाकळगाव - शेनकुड सरपंच पदी विद्या माधव नागरगोजे यांची निवड

**दैनिक जनप्रभात**
**उपसंपादक लातूर जिल्हा**
**विष्णु मोहन पोले**
-----------




**अहमदपूर** दि.४ तालुक्यातील टाकळगांव -शेनकुड सात जण सदस्यीय ग्रूप ग्रामपंचायत निवडणूक २०२१ मध्ये विद्या माधव नागरगोजे यांच्या पॅनलं चे सहा सदस्य निवडुन आले होते ग्रूप ग्रामपंचायत असल्या कारणाने दोन्ही गावातील नागरिकांच्या एकमताने टाकळगाव व शेनकुड या दोन्ही गावांना अडीच - अडीच वर्ष सरपंच पदी रहण्याचे एकमताने मंजूर करण्यात आले त्या प्रमाणे २०२१ ते २०२३ हा काळ सरपंच संग्राम नरवटे यांनी पूर्ण केला आणि दि ३१ जानेवारी२०२४ रोजी विद्या माधव नागरगोजे यांना सरपंच पदाची जबाबदारी देण्यात आली. या निवडीसाठी ग्रामविस्तार अधिकारी मुरुडकर, ग्रामसेवक गिता सारोळे, तसेच तलाठी सतिष बिराजदार यांच्या सह माजी सरपंच सोपानराव जायभाये, माजी सरपंच तुकाराम मुंढे, तसेच टाकळगाव -शेनकुड गावचे गावकरी माधव प्रभाकर नागरगोजे,संग्राम शंकर नागरगोजे , अर्जुन संभाजी नागरगोजे , गोविंद रंगनाथ नागरगोजे , विलास माणिकराव नागरगोजे , मंगेश नारायण नागरगोजे , सुभाष नरवटे ,सतीश नरवटे , भरत जंगवाड ( पोलीस पाटील ) भानुदास दिगंबर नागरगोजे , अशोक अंगद नागरगोजे , सचिन चंद्रकांत नागरगोजे , ईश्वर नरवटे , विजय नरवटे , दिलीप मुंडे , राजू मल्हारी नरवटे , गोविंद पोले , बालाजी वडसे , बाळू मुंडे ,श्याम पाटील , गणेश नागरगोजे , मुरलीधर मुंडे , शंकर बापूराव नागरगोजे , आदी ग्रामस्थांनी उपस्थित राहुन नवनिर्वाचित सरपंच विद्या नागरगोजे यांना पूढील कार्यासाठी सुभेच्छा दिल्या.




## वनस्पती तज्ज्ञ, पर्यावरणप्रेमी आबा रणवरे यांना राज्यस्तरीय अनमोल टी.एम. जी कार्यगौरव पुरस्कार

**दैनिक जनप्रभात**
**सातारा/जीवन मोहिते :**
---------------




लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद व टी.एम.जी.क्रिएशन्सच्या विद्यमाने ५ व्या वर्धापनदिना निमित्त मुंबई मराठी पत्रकार भवन येथे ४ फेब्रुवारी रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात जुईनगर येथील वनस्पतीतज्ज्ञ व पर्यावरणप्रेमी तसेच औषधी वनस्पतींचे उपचारक आबा रणवरे राज्यस्तरीय अनमोल टी.एम. जी कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमात पत्रकारिता सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, आरोग्य सेवा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या अनेक व्यक्तीमत्वांनाही फेटा, आकर्षक सन्मानचिन्ह, मेडल व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

यावेळी विचारमंचावर माजी माहिती व जनसंपर्क संचालक देवेंद्र भुजबळ, ज्येष्ठ अभिनेते जयवंत वाडकर, 'तारक मेहता का उल्टा चश्मा'फेम अभिनेते जाकिर खान, माजी पोलीस अधिकारी सुनिता नाशिककर, डॉ. जालिंदर महाडिक, अभिनेत्री अमृता उत्तरवार, रेड प्लॅनेटच्या संचालिका सिम्मी शेख, आयकॉन फाऊंडेशनचे अध्यक्ष मोहन बडगुजर आदि मान्यवर उपस्थित होते. आबा रणवरे यांनी बेस्टमध्ये दीर्घकाळ चालक म्हणून सेवा बजावत असतानाच एक छंद म्हणून औषधी वनस्पती, निसर्गोपचाराच्या माध्यमातून अनेकांच्या जुनाट दुखण्यांवर प्रभावीरित्या उपचार केले आहेत. त्याबद्दल त्यांना विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या यांनी नावाजले असून अनेक नामांकित संस्था, संघटना, मंडळे यांनी मानाचे प्रुस्कात देऊन त्यांच्या कार्याची उचित दखल घेतली आहे. सदर लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार वितरण सोहळ्याच्या यशस्वितेसाठी लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषदेचे संस्थापक एन. डी. खान व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रदीर्घ मेहनत घेतली.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा कार्यकर्ता मेळावा संपन्न..

**दैनिक जनप्रभात नवनाथ डिगोळे**
-------------

रोहीना ता चाकुर येथे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा माजीमंत्रीमाविनायकरावपाटीलसाहेब व जिल्हाध्यक्ष मा.संजयजी शेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यकर्ता मेळाव्यात पक्षाच्या ध्येयधोरणांवर चर्चा करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर व मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यावर प्रेम करणारे पदाधिकारी कार्यकर्ते गावकरी माता भगिनी मोठ्या प्रमाणात आणि प्रचंड उत्साहात उपस्थित होते.. यावेळी अहमदपुर-चाकुर मतदार संघातील विविधसेलच्या पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले, याप्रसंगी युवती जिल्हाध्यक्षा सौ.स्नेहाताई मोटे,मा.सय्यद साजिदभाई, मा.शिवाजीराव मुळे,मा.सोमेश्वर कदम,मा.शिवाजीराव बैनगीरे,मा.रामभाऊ बेल्लाळे,मा.निळकंठराव मिरकले,मा.विलास बापु सुर्यवंशी, मा.प्रशांत पाटील, मा.अभिमन्यू धोंडगे,मा.श्रीमंतराव शेळके,मा.महेश व्हते,मा मच्छिंद्र नागरगोजे,मा.जर्रानखान पठाण, मा.परमेश्वर घोगरे,मा.निळकंठ पाटील, मा.राजीव खंदाडे,मा. व्यंकटराव पाटील, मा.केरबा कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते.



# भाजपा युवा मोर्चा नमो चषक स्पर्धेचे खासदार सुधाकरराव श्रृंगारे यांच्या हस्ते शानदार उद्घाटन संपन्न.

**दै,जनप्रभात**
**उपसंपादक / राठोड रमेश पंडित**
-------------

**अहमदपूर:-** भाजपा युवा मोर्चा नमो चषक आयोजित हॉलीबॉल स्पर्धेचे व चित्रकला स्पर्धे चे उद्धाटन लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकरराव श्रंगारे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख , भाजपाने प्रदेश प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा निवडणुक प्रमुख गणेश दादा हाके पाटील,ओबीसी चे प्रदेश सचिव ज्ञानोबा बङगीरे ,माजी सरपंच बालाजी सारोळे तालुकाध्यक्ष .प्रतापराव पाटील , भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी,ओबीसी चे जिल्हा सरचिटणीस महेश बिलापट्टे ,युवा मोर्चाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य विवेकानंद उजळंबकर ,प्रदेश निमंत्रित सदस्य बालाजी होळकर, दत्तात्रेय जमालपुरे, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष रामानंद मुंडे,शहराध्यक्ष सुशांत गुणाले ,तालुका सरचिटणीस माणिक नरवटे ,बुथ विस्तारक चंदशेखर डांगे,गणेश कापसे, बालाजी पडोळे,महीला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा जयश्री केंद्रे,परमेश्वर आढाव, मुख्याधिपीका सौ. आशा रोडगे अदिसह भारतीय जनता पक्षाचे नेते पदाधिकारी व कार्यकर्तेउपस्थित होते.शिरुर ताजबंद येथील महेश विद्यालयाच्या प्रांगणात व्हॉलीबॉल स्पर्धे चा शानदार उदघाटन सोहळा खासदार सुधाकरराव श्रृगारे व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला.

तीस व्हॉलीबॉलच्या संघानी स्पर्धेत सहभाग घेतला तर अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील चित्रकला स्पर्धेत एक हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.





# महाराष्ट्र ननिर्माण सेनाच्या वतीने कारसेवक व रामभक्त यांचा भव्य गौरव सोहळा साजरा करण्यात आला

**दै, जनप्रभात**
**अरविंद कांबळे /प्रतिनिधी**
-----------

**पूर्णा, :-** आज दिनांक ४ फेबरुवारी रोजी लोक कल्याण बँक जवळ आनंद नगर येथे पुर्णा शहरात प्रथमतः आयोध्या येतील राम मंदिर निर्माणसाठी बलिदान व योगदान देणाऱ्या कारसेवका बरोबरच पुर्णा शहरात भूतो न भविष्य अशी शोभायात्रा व दरवर्षी रामनवमी साजरी करणाऱ्या राम भक्तांचा भव्य गौरव सोहळा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे नेते दिलिप बापू धोत्रे व रुपेश भैया सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली मनसे शहर अध्यक्ष गोविंद राज ठाकर यांनी आयोजित केला होता गौरव सोहळ्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ जयप्रकाश मोदाणी साहेब व्यापारी महासंघ तालुकाअध्यक्ष स्वागताध्यक्ष रुपेश भैया सोनटक्के जिल्हा अध्यक्ष परभणी, प्रमुख पाहुणे यादव माहत्मे जिल्हा उपाध्यक्ष, राहुल डोंगरे तालुका अध्यक्ष गंगाखेड, प्रमुख उपस्थिती, अनिल बुचाले तालुका अध्यक्ष पुर्णा, पवन बोबडे तालुका अध्यक्ष मनविसे, मारोती घोडसे उप तालुकाध्यक्ष, ओम यादव शहर सरचिटणीस, पंकज राठोड, राजेश यादव, अविनाश मैत्रे उप शहर अध्यक्ष, भारत बोबडे, शहर अध्यक्ष मनविसे शशिकांत सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते या सर्व मान्यवरांच्या हस्ते पूर्ण शहर व ग्रामीण भागातील सर्व कार्य सेवकांचा व पूर्ण शहरात





राम जन्मोत्सव साजरी करणारे सर्व रामभक्त यांचा श्रीफळ सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला या कार्यक्रमात कार सेवक श्री प्रभूदयाल ओझा, व ॲड शिवप्रसाद सोनी यांनी कार सेवेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे आयोजन गोविंद राज ठाकर शहर अध्यक्ष यांनी केले राधेश्याम , महामुने , योगेश खंदारे ,वैभव जिरवणकर, शिवानंद कापसे, यांच्यासह मनसे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले तरी या गौरव सोहळ्यास पुर्णा शहरातील सर्व हिंदू समाज बांधव व कारसेवक रामभक्त व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजक गोविंद राज ठाकर मनसे शहराध्यक्ष पूर्णा हे होते.

# सातारच्या सुपुत्राने ३ विश्वविक्रम प्रस्थापित केले !



**दै, जनप्रभात / जीवन मोहिते**
----------

**सातारा:** कृष्णा विश्व विद्यापीठ, कराड येथील स्पोर्ट्स फिजिओथेरपीस्ट व साताऱ्याचे सुपुत्र डॉ.प्रसन्नजीत प्रमोद निकम यांनी नुकतेच एका दिवसात २५ पेटंट्स फाईल करून एकाच वेळी तब्बल तीन विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा बहुमान पटकावला. त्यांनी फिजिओथेरपी क्षेत्रातील आपल्या वर्षानुवर्षांच्या संशोधनातून तयार केलेले विविध २५ इनोव्हेटिव्ह उपकरणांची नोंद पेंटेंटच्या स्वरूपात केली होती. ''इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस'' आणी ''वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया'' मध्ये एका वेळी ३ विश्वविक्रम केल्याबद्दल त्यांचे विविध स्तरातून हार्दिक अभिनंदन होत आहे. या यशाचे श्रेय डॉ.निकम यांनी आई-वडील,बहीण,कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलगुरु श्री.डॉ. सुरेश भोसले, रिसर्च डायरेक्टर डॉ. दिनेश अगरवाल, फिजिओथेरपी कॉलेजचे डीन डॉ. जी.वरधराजूलू, डॉ.जयंत पवार आणि समस्त कृष्णा विश्व विद्यापीठाच्या स्टाफला दिले.

# नाल्यातील दलदलीत अडकून एका इसमाचा मृत्यू

**दै, जनप्रभात**
**नंदू कोल्हे /प्रतिनिधी**
**कामठी:**-रविवार दिनांक फेब्रुवारीला सकाळी सात वाजता कोळसाटलाच्या नाल्यात कचरा विनत असताना एक अनोळखी व्यक्तीची दलदलीत फसून मृत्यू झाली तेथील रहिवासीयांना त्याचे शव दिसून आले याची माहिती येथील रहिवासी माजी पार्षद हर्षद ने जुना पोलीस स्टेशन कामठी यांना दिली पोलीस स्टेशनचे पीआय दीपक भिताडे, एपीआय दुबाले, एपीआय राखुंडे, ढगे मेजर हे आपल्या टीम सोबत घटनास्थळावर पोहोचून माजी पार्षद हर्षद यांच्या सहकर्मी सोबत मिळून दलदलीत फसलेल्या शव ला बाहेर काढून घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शविच्छेदनासाठी कामठी ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदनगृह येथे पाठवून पुढील तपास एपीआय दुभाले करीत आहे.



# बुध्दीस्ट इंटरनॅशनल नेटवर्कतर्फे बुद्ध लेणी सहल संपन्न

**दै, जनप्रभात**
**जीवन मोहिते /प्रतिनिधी**
-----------------

**सातारा:-** मूलनिवासी'चे राष्ट्रीय नेते वामन मेश्राम,राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विलास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा - सातारा जिल्हा यांच्या विद्यमाने, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे जिल्हाध्यक्ष किशोर थोरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा महासचिव विनोद लादे,कराड तालुकाध्यक्ष कैलास कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कराड तालुक्यातील सर्व ग्राम शाखा अध्यक्ष यांच्या सहकार्याने आगाशिव जखिणवाडी,बुद्धलेणी धम्म सहल धम्मसहल मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

जिल्ह्यातील बौद्ध कालीन लेण्यांच्या विरासतीवरती होत असलेले विद्रूपीकरण अतिक्रमण थांबवुन लेण्यांचे संवर्धन व्हावे. यासाठी जन जागृती व जन चळवळ निर्माण व्हावी. या प्रामाणिक उद्देशाने या ''बौद्ध धम्म सहली'' चे आयोजन करण्यात आले होते.

विरासत सिर्फ देखना हमारा उद्देश्य नहीं। विरासत बचाने के लिए लोगों को जागरूक करना और अपनी विरासत का अपने शासन के जरिए संवर्धन करना हमारा उद्देश्य है । याप्रमाणे कार्यकर्ते काम करीत आहेत.

सदरच्या कार्यक्रमास ग्रामशाखाध्यक्ष सतीश वाघमारे, शशिकांत दुपटे, विश्वनाथ बनसोडे विरावडे,श्रीधर गोखले व हेमंत कांबळे,कराड शहराध्यक्ष आनंद कांबळे,संतोष वीर,दिलीप सावंत,उपासक,उपासिका, विद्यार्थी बाल-बालिका उपस्थित होत्या.बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे कराड तालुकाध्यक्ष कैलास कांबळे यांनी आभारप्रदर्शन केले.




बुद्ध लेणी सहलीप्रसंगी किशोर थोरवडे शेजारी लेणीप्रेमी

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रयत महोत्सवाचे आयोजन

## रयत बहुऊद्देशिय सेवाभावी संस्थेचा ऊपक्रम

**दै, जनप्रभात**
**अरविंद कांबळे/ प्रतिनिधी**
-----------

**परभणी :**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रयत बहुऊद्येशिय सेवाभावी संस्थेच्यावतीने दि:१फेब्रुवारी ते २९ फेब्रुवारी हा पुर्ण महिना संस्थेच्या वतिने रयत महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असुन या महोत्सवात युवक,युवती,पुरुष,महिलांना विविध विषयावर मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येणार आहे महोत्सवाच्या माध्यमातुन गावागावात आर्थिकसाक्षरता बेरोजगार युवक युवती साठी रोजगार व स्वंयरोजगाराविषयी मार्गदर्शन व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असुन या संधीचा समाजातील गरजु व होतकरु युवकांनी घ्यावा या बरोबरच आपण कष्टाने कमवलेल्या पैशाचे नियोजन कसे करावे याविषयी गावागावात आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन करुन लोकांना आर्थिक नियोजन,बचतआणि गुंतवणुक,विमा,सुकन्या समृध्दी योजना पेन्शन आदी विषयावर या रयत महोत्सवातुन मार्गदर्शन करण्यात येणार आहे तरी या महोत्सवाचा अधिकआधिक लोकांनी फायदा घ्यावा असे आव्हाण संस्थेच्या अध्यक्षा सौ.स्वाती सुरवसे,सामाजिक कार्यकर्ये गजानन सुरवसे यांनी केले.




# सुनिल चव्हाण यांचा सन्मान



**दै, जनप्रभात**
**प्रतिनीधी/ धनराज पवार**
-----------

**आर्णी :-** वसंतराव नाईक बहुउद्देशीय संस्था ईचोरा तर्फे आयोजित गुरुकुल प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल. इचोरा माध्यमिक विद्यालय इचोरा व उच्च प्राथमिक मराठी शाळा इचोरा यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धे त एकूण ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.पहिला क्रमांक कू.योगिता शेंडे व कू.धम्मदिनी धोंगडे दुसरा क्रमांक कू.मुद्रा जगदाळे तिसरा क्रमांक कू.रुद्रा क्षी राठोड व ग्रुप तर चौथा क्रमांक कू.स्वरा राठोड यांनी पटकाविला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सुरेश जयस्वाल होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री .पुंडलिक राठोड व मोतीलाल राठोड हे होते नृत्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून माळेगांव येथील सिनेकलावंत सुनिल रामचंद्र चव्हाण यांनी योग्य रित्या पार पाडली पाहुणे मंडळीच्या हस्ते सुनिल चव्हाण यांचा शाल श्रीफळ व स्मृति चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला या वेळी बरीच रसिक मंडळी हजर होती



## मुंबई- मुंबई कॉँग्रेस कमिटी कार्यालय आझाद मैदान येथे द युवा ग्रामीण पत्रकार संघाची मराठी दिनदर्शिका देण्यात आली

# ...त्यामुळेच सामाजीक ऐक्य राखण्यास मदत होईल !



संपादक शैलेंद्र पळणीटकर यांना बंधुत्व पुरस्कार प्रदान करताना दत्ता मर्ढेकर, अनिल वीर व इतर.

**दै, जनप्रभात**
**जीवन मोहिते/प्रतिनिधी**
-------------

**सातारा:-** जिल्ह्याचे मुखपत्र म्हणून दै.ऐक्य यांनी अनेक चढ-उतार पाहिलेले आहेत. पळणीटकर कुटुंबीयांतील सर्व पिढीतील उत्तराधिकारी यांनी आधुनिक बदल घडवला आहे. १०० वर्षांची परंपरा यशस्वीपणे पार पडलेली आहे.त्यामुळे शंभर नंबरी ठरलेल्या ऐक्याची वाटचाल नक्कीच प्रगतीपथाकडे जाईल. आपसुकच सामाजिक ऐक्य राखण्यास मदत होईल.असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. दै.ऐक्याच्या शताब्दी वर्षादिनाचे औचित्य साधून बंधुत्व पुरस्कार मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.संपादक शैलेंद्र पळणीटकर (बाबा) यांना ज्येष्ट पत्रकार दत्ता मर्ढेकर यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.यावेळी संस्थापक अनिल वीर,प्रा.सुनील कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड.शिवानी पळणीटकर यांनी स्वागत केले.सदरच्या सोहळ्यास पालकमंत्री, खासदार,आमदार, लोकप्रतिनिधी, अभिनेते, अभिनेत्री,अधिकारी, पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर,वृत्तपत्र दैनिकांचे संपादक,पत्रकार, वाचक,वितरक,पळणीटकर व ऐक्य संपूर्ण परिवार मोठ्या संख्येनी उपस्थित होता.

# राज्यातील शिक्षकेतरांचा १२फेब्रुवारीला मोर्चा

## २० पासून काम बंद आंदोलन हजारोच्या संख्येने उपस्थित राहा -संजय डावकर,नामदेव वाघ...

**दै, जनप्रभात**
**गितांजली लव्हाळे**
-------------

**बीड :-** शिक्षकेतर संघटनेच्या अधिवेशनात शिक्षण मंत्री यांनी उपस्थित राहून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आठ दिवसात सोडवू असे आश्वासन दिले होते मात्र त्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ यांचे अध्यक्ष अनिल माने,सरकार्यवाह शिवाजी खांडेकर, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर यांच्या नेवृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. १२ फेब्रुवारी रोजी पुणे येथे शनिवार वाडा ते शिक्षण संचालक व शिक्षणायुक्त कार्यालय सेंट्रल बिल्डिंग येथे राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने मोर्चा व २० फेब्रुवारीपासून राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनाद्वरे म्हटले आहे. ७ जानेवारी रोजी सावंतवाडी सिंधुदुर्ग येथे संघटनेच्या अधिवेशनात शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी उपस्थित राहून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न त्वरीत सोडवू असे आश्वासन दिले होते मात्र त्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने मोर्चा काढणार असल्याचे निवेदन मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शिक्षण मंत्री यासह संबंधित विभागांना देण्यात आले आहे, या निवेदनात म्हटले आहे, की ७ जानेवारी रोजी झालेल्या शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या अधिवेशनात शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी उपस्थित राहून शिक्षकेतर कर्मचारी यांना



इतर शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या १०/ २०/ ३० च्या लाभाची योजना त्वरित मंजूर करावी, आकृतीबंध संदर्भात नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेला अहवाल मंजूर करून शिक्षकेतरांच्या भरतीस त्वरित परवानगी मिळावी, शिक्षकेतरांना १२ वर्षे व २४ वर्षानंतर पहिला व दुसरा लाभ तत्काळ लागू करण्यात यावा, सेवेत असल्यास आपली शैक्षणिक पात्रता वाढविल्यास त्या सर्व प्रकारच्या पदावर वेतन संरक्षणासह विना अट संवर्ग बदलून मिळावा व पवित्र प्रणाली मधून वगळण्यात यावे, पदवीधारक ग्रंथपालांना पदवीधर वेतन श्रेणी लागू करावी, विद्यार्थी संख्या कमी झाल्यास शिक्षकेतरांना वेतन व वेतन श्रेणी संरक्षण मिळावे, विनाअनुदानित तुकडी वरील विद्यार्थी संख्या शिक्षकेतर पदे मंजूर करताना ग्राह्य धरावे, यासह आदी प्रलंबित प्रश्न त्वरीत निकाली काढण्यात येतील असे आश्वासन दिले होते. परंतु याबाबत शासनाकडून कोणतीही सकारात्मक हालचाल होताना दिसून येत नाही किंबहुना संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून काय वस्तुस्थिती आहे हे सांगण्यात येत नाही. त्यामुळे नविलाजास्तव सोमवार दि १२ फेब्रुवारी रोजी पुणे येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे व तसेच मंगळवार दि. २० फेब्रुवारी पासून राज्यभरात काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पुणे येथे होणाऱ्या मोर्चासाठी राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी नगर चे विभागीय सचिव कावळे सर बीड जिल्हा अध्यक्ष संजय डावकर सचिव वाघ नामदेव उपाध्यक्ष नंदकुमार शिंदे, मोसीम शेख, दत्तात्रय आगवान, कार्यध्यक्ष कंळबकर अविनाश, रगडे बाळासाहेब, सोळंके बालासाहेब,सतिश बहिर यांनी केले आहे.

************

# अवैद्यरीत्या रेती उत्खनन करुन (गौण खनिज) ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेतीची वाहतुक करणारे पोलीसांच्या जाळयात

**दैनिक जनप्रभात**

------------

**वर्धा :**- हकीकत--या प्रमाणे आहे की आज दिनांक ०५/०२/२०२४ रोजीचे सकाळी ०८/१५ ते ०९/१५ वा चे दरम्यान मौजा गुंजखेडा येते यातील आरोपी ट्रॅक्टर चालक श्याम बाळाराम ठाकरे व २९ वर्ष राहणार वल्लभनगर गुंजखेडा याचे मदतीने आरोपी क्र. २ ट्रॅक्टर मालक ललित हेमंतराव इंगळे वय ४० वर्ष राहणार गांधीनगर पुलगाव असे संगणमताने एक लालरंगाच्या बिना नंबरचे ट्रँक्टर ट्रालीमध्ये वर्धा नदीचे पात्रातुन रेती भरुन रेतीचा कोणताही परवाना नसताना व वाहनाचे कोणतेही जवळ न बाळगता अवैद्यरीत्या चोरीच्या रेतीची वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने ट्रँक्टर चालकाचे ताब्यातुन १) एक जुना वापरता लालरंगाचा सोनालिक कंपनीचा बिना नंबरचा ट्रँक्टर किमंत ४०००००/- रु. २) एक जुनी वापरती बिना नंबरची ट्रॉली किमंत अंदाजे २०००००/- रु. ३) ट्रालीमध्ये भरुन असलेली ओली रेती ( गौण खनिज) १०० फुट (१ ब्रास) किमंत ७०००/- रु. ४) एक तखतज कंपनीचा एंड्राँईड मोबाईल ९०००/- रु. असा एकुण जुमला किमंत ६१६,०००/- रु. चा माल पंचासमक्ष जप्त करुन आरोपीतांविरुध्द अपराध क्रमांक १०३/२४०कलम ३७९,१८६,३४ भा.द.वी.सहकलम ३(१),१८१,१३०/१७७मो.वा.का. अन्वयेगुन्हानोंदकरूनतपासातघेतला.

सदरचा गुन्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मंगेश भोयर साहेब यांचे मार्गदर्शनात स.फौ.सुधिर लडके यांना मुखबीर कडुन खात्रीशीर खबर मिळाले वरुन एक ट्रँक्टर चएड पम्प हाऊस रोड गुंजखेडा रोडने वर्धा नदीचे पात्रातुन एक ट्रँक्टर ट्रालीमध्ये अवैद्यरीत्या ओली रेती भरुन ट्रँक्टर चालक रेतीने भरलेला ट्रँक्टर गुंजखेडा गावाकडे येत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून पो.स्टाफ व पंचासमक्ष १) ट्रँक्टर चालक शाम बालाराम ठाकरे वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, वल्लभ नगर गुंजखेडा, ता. देवळी २) ट्रॅक्टर मालक ललित हेमंतराव इंगळे वय ४० वर्ष रा.गांधी नगर पुलगाव ता. देवळी (पसार) याचे ताब्यातुन १) एक जुना वापरता लालरंगाचा सोनालिक कंपनीचा बिना नंबरचा ट्रँक्टर किमंत ४०००००/- रु. २) एक जुनी वापरती बिना नंबरची ट्राली किमंत अंदाजे २०००००/- रु. ३) ट्रालीमध्ये भरुन असलेली ओली रेती ( गौण खनिज) १०० फुट (१ ब्रास) किमंत ७०००/- रु. ४) एक ींर्ळीं कंपनीचा एंड्राँईड मोबाईल किमंत अंदाजे ९०००/- रु. असा एकुण जुमला किमंत ६१६,०००/- रु.चा माल मिळुन आल्याने पोलीस पोलीस स्टेशन पूलगाव येते गुन्हा नोद केला. सदरची कार्यवाही मा.नरुल हसन पोलीस अधिक्षक सा.जिल्हा वर्धा, मा.डॉ.सागर कवडे अपर पोलीस अधीक्षक, मा.सहाय्यक पोलीस अधिक्षक पुलगाव श्री. राहुल चव्हाण यांचे मार्गदर्शनात श्री. मंगेश भोयर सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पुलगाव यांचे निर्देशाप्रमाणे स.फौ.सुधिर लडके,पो. कॉ.ओमप्रकाश तल्लारी, विश्वजीत वानखेडे यांनी केली आहे.



# सफाई कामगारांच्या मागण्या तातडीने पूर्ण करा- डॉ. विपीन इटनकर

## मनपाच्या संबंधित विषयांवर आज बैठक घेण्याच्या सूचना

**दैनिक जनप्रभात**
**दिलीप येवले /प्रतिनिधी**

--------------

**नागपूर, :** सफाई कामगारांच्या विविध मागण्यांचे विषय तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज अधिकाऱ्यांना दिल्या. महानगर पालिकेसंबंधित सफाई कामगारांच्या मागण्यांसाठी मनपा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आज ६ फेब्रुवारी २०२४ रोजी बैठक घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.येत्या ९ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य पी.पी. वावा यांच्या अध्यक्षतेखाली सफाई कामगारांच्या विविध विषयांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होणार आहे, तत्पूर्वी डॉ. इटनकर यांनी या विषयांसंदर्भात आढावा घेतला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेसिनी तेलगोटे, मनपा उपायुक्त गजेंद्र महल्ले,



पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) विजय माहुसकर, सहाय्यक पोलीस आयुक्त नयन आलूरकर, कामगार कल्याण विभाग आणि आरोग्य विभागाचे अधिकारी, कामगार संघटनांचे पदाधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. सफाई कामगारांना सेवानिवृत्ती नंतर देण्यात येणारे विविध लाभ, जातपडताळणी कार्यालयात प्रलंबित असणारे सफाई कामगारांचे प्रकरणे अशा एकूण १३ विषयांवर यावेळी चर्चा झाली. या विषयांबाबत डॉ. इटनकर यांनी सद्य: परिस्थिती जाणून घेतली तसेच अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत सफाई कामगारांच्या संबंधित मागण्या तातडीने पूर्ण करण्याच्या दिशेने कार्य करण्याचे निर्देश दिले. कोविड महामारीच्या काळात मृत्यूमुखी पडलेल्या महानगर पालिकेच्या सफाई कामगारांना द्यावयाची मदत, मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबातील व्यक्तींना लाड पागे समितीच्या निर्देशानुसार नोकरी देणे, सफाई कामगारांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करणे आणि महा दलित महासंघाने निर्देशित केलेले मनपात कार्यरत अनुभव नसणारे व पारंपरिक कामे करणाऱ्या सफाई कामगारांबाबतचे विषय मनपा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेवून निकाली काढण्याचे निर्देशही डॉ. इटनकर यांनी बैठकीत दिले.

# महाबळा येथील श्रीमती इंदिरा हायस्कुलमध्ये वार्षीक सनेहसंमेलन

**दैनिक जनप्रभात**
**प्रशांत झाडे/ प्रतिनिधी**

------------



**सेलू :**- तालुक्यातील महाबळा येथील श्रीमती इंदिरा हायस्कुलमध्ये स्नेहसंमेलन सांस्क्रुतीक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन शाळेचे संस्थाध्यक्ष प्रविण ईरुटकर तसेच प्रमुख अतिथी म्हणुन मुख्याध्यापिका मनिषा प्र.ईरुटकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन उदघाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथीनी विद्यार्थ्याचा सार्वागीन विकास होवुन त्यांच्या कलागुणांना वाव देणे आजच्या आधुनिक काळात महत्वाचे आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळि विद्यार्थ्यानी सुंदर अशी नुर्त्य ,नाटिका,व गीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाला गावकरी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिती पुंड ,संचालन प्रज्ञा थुल तर आभार प्रिया भोंडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीसाठि शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी आदिनी सहकार्य केले.

# कार पिकअपच्या अपघातात आणखी एका वनरक्षकाचा मृत्यू

**मृत्यूंची संख्या तीन**







**दैनिक जनप्रभात**
**जयश्री मेंघरे/ प्रतिनिधी**

------------

**वैद्य**-रामटेक बायपास तुमसर मार्गावर दि.२४ जानेवारी रोजी रात्री २ वाजताच्या सुमारास एका कार व पिकअप च्या धडकेत वनविभागाचे क्षेत्रसहाय्यक यांचा घटनास्थळी तर हंगामी मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली होती.त्याच अपघातात गंभीर स्वरूपात जख्मी झालेले पवनी ( देवलापार ) येथील वनरक्षक प्रदीप सूर्यवंशी यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू असताना त्यांच्यादेखील मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.प्राप्त माहितीनुसार,पवनी वनविभाग कार्यालयातील क्षेत्र सहाय्यक स्वप्नील जाधव आपल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यासह कारने मित्राच्या लग्न सभारंभाच्या कार्यक्रमाला गोंदिया येथे गेले होते.लग्न समारंभाहून परत येताना रामटेक तुमसर बायपास मार्गावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या पिकअप ला त्यांच्या कारची जोरदार धडक झाली होती. अपघात इतका भीषण होता की, यात कारचा समोरील भागाचा चुराडा झाला होता तर पिकअप चा मागील भाग वेगळा झाला होता. या अपघातात पवनी वनविभागात कार्यरत असणारे क्षेत्र सहाय्यक स्वप्नील जाधव वय ३५ वर्ष यांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता तर सोबत असेलेले मनोज इनवाते वय ३५ वर्ष याचादेखील उपचारादरम्यान मृत्यू झाला होता व अन्य प्रदीप सूर्यवंशी वय ३५ वर्ष व निकेश कुंभलकर वय ३० वर्ष. या दोन व्यक्तींची स्थिती गंभीर असल्याने त्यांना नागपूर मेडिकल येथे उपचार सुरू होते. मात्र गंभीर जखमी असलेले वनरक्षक प्रदीप सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला आहे. दिलदार व्यक्तिमत्व असणाऱ्या या व्यक्तीच्या अशा अचानक निघून गेल्याने पवनी परिसरात संपूर्ण शोककळा पसरली आहे.प्रज्ञा कॉम्पुटर एज्यूकेशन इन्स्टिटयूट चे संचालक रुपेश सरोदे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत म्हटले की, एक दिलदार व्यक्तीमत्व, एक चांगला माणूस या जगाला शेवटचा निरोप देऊन निघून गेला. ओळखी फक्त एक दोन वर्षाची पन त्यांचा दिलदार स्वभावामुळे खुप वर्षाचे जुने मित्र असावे असे वाटायचं. एक चांगला भला माणूस आपल्यातुन कायमचा निघून गेला. साहेब!!! तुम्ही कायम नेहमी आमच्या स्मरणात राहाल... भावपुर्ण श्रद्धांजली साहेब. असे शब्द बोलून रुपेश सरोदे यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.......

# पंचायतराज अभियानात काटोल पंचायत समिती विभागात प्रथम तर राज्यात दुसरी

## सभापती संजय डांगोरे यांनी स्वीकारला पुरस्कार एकूण २८ लाखाचे पुरस्कार प्राप्त




**दैनिक जनप्रभात**

------------

**नरखेड : -** राज्य शासनाकडून यशवंत पंचायतराज अभियान अंतर्गत प्रशासकीय व्यवस्थापन व विकास योगदान कार्यासाठी पुरस्कार प्रदान करण्यात येते.काटोल पंचायत समितीला २०२२-२३च्या यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत नागपूर विभागातून ११लक्ष रुपयाचा प्रथम क्रमांकाचा तर राज्यातून १७ लक्ष रुपयाचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या शुभहस्ते सभापती संजय डांगोरे यांनी वनामती सभागृह, नागपूर येथे स्वीकारला. यावेळी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, वनामती संचालक डॉ. मिथाली सेठी, विभागीय उपायुक्त डॉ. कमलकिशोर फुटाणे प्रामुख्याने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारतेवेळी काटोल पंचायत समिती सभापती संजय डांगोरे, उपसभापती निशिकांत नागमोते, गटविकास अधिकारी दीपक गरुड, माजी बिडीओ संजय पाटील,पं. स.सदस्य धम्मपाल खोब्रागडे, अनुराधाताई खराडे, चंदाताई देव्हारे,अरुण उईके, लताताई धारपुरे,प्रतिभाताई ठाकरे, विस्तार अधिकारी प्रविण गावंडे, विस्तार अधिकारी उत्तम झेलगोंदे,विस्तार अधिकारी सुरेश नेहारे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करतांना सभापती संजय डांगोरे म्हणाले, काटोल पंचायत समिती नेहमीच विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते. पंचायत समितीत व्यवस्थापन, कार्यपद्धती, स्वच्छता उत्तम आहे. विशेष म्हणजे पंचायत समितीत येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचा मान सन्मान होतो. सभापती म्हणून यशवंत पंचायतराज अभियानात राज्यात पुरस्कार पटकावणे ही माझ्यासाठी फार आनंदाची बाब आहे. पुढील काळामध्ये सर्वांच्या सहकार्याने आणखी जास्त प्रयत्न करून पंचायत समितीचे नाव देशपातळीवर नेण्याची ग्वाही दिली. नागपूर विभागातील एकूण ६३ पंचायत समितीमधून काटोल पंचायत समितीला सर्वाधिक पुरस्काराचा मान मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

# बिनबुडाचे आरोप करून सवंग लोकप्रियता मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न

## पत्रकार परिषदेत अतुल वांदिलेंचे प्रतिउत्तर ;राष्ट्रवादी कार्यकर्ता मारहाण प्रकरण





**दैनिक जनप्रभात**
**अमोल झाडे/ ता. प्रतिनिधी**

------------

**समुद्रपुर:**- राष्ट्रवादी पक्षात राहून अन्य पक्षाचे हितसंबंध जोपासणारी काही नेते मंडळी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सुनील राऊत व माझ्याकडून पक्षाची होत असलेली बांधणी थांबविण्यासाठी षडयंत्र रचित आहे.एकाच दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या २०० पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली राष्ट्रवादीचा आम्ही घेतलेला पदाधिकारी मेळावा भव्य झाला. मागील डिसेंबर महिन्यात मी हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात काढलेल्या जनसंवाद यात्रेनंतर पक्षात मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी प्रवेश होत आहे. या सर्व बाबींने विचलित झालेले आमच्या पक्षातील काही नेते मंडळी चिडून असून माझ्या व जिल्हाध्यक्ष सुनील राऊत यांच्या विरोधात षडयंत्र रचित आहे . माझ्यावर केलेले आरोप बिनबुडाचे असून सवंग लोकप्रियता मिळविण्याचा विरोधकांचा केविलवाणा प्रयत्न आहे असे राष्ट्रवादी कॉंगेसचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

विरोधक नशेच्या आहारी गेलेला मनीष गांधी नावाचा कार्यकर्ता मोहरा म्हणून वापर करीत आहे. या मनीष गांधी नावाच्या कार्यकर्त्यांनी मला फोन करून नियुक्ती कशा केल्या ?असे विचारीत असभ्य अश्लील शब्दाचा प्रयोग करीत शिवीगाळ करू लागला होता .समुद्रपूर येथे एका कार्यकर्त्याचा वाढदिवसानिमित्त गेलो असता हा मनीष गांधी नावाचा कार्यकर्ता मला भेटला यावेळी तो नशेत होता व माझ्यासोबत हुज्जत घालत होता. माझ्याकडे अंगावर चालून आला असता त्याला बाजूला सारले . तो नशेत असल्याने असंतुलित होत बाजूच्या लोखंडी अँगल ला धडकला यादरम्यान त्याच्या डोक्याला किरकोळ जखम झाली. त्याला दवाखान्यात जाण्याची सांगून आम्ही तिथून निघून गेलो. मात्र यानंतर काही नेत्यांनी आपल्या डॉक्टर पुत्राचा उपयोग करत ग्रामिण रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांवरती दबाव टाकण्याचा प्रयत्न करून सावंगी (मेघे ) येथील रुग्णालयात उपचाराकरिता पाठवून आमच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्याचा प्रयत्न केला . आमच्या काही लोकांवर गुन्हा देखील नोंदवून घेतला मात्र या जिल्हाध्यक्ष सुनील राऊत यांना देखील गोवण्यासाठी पत्रकार परिषद घेत आपल्याच पक्षातील जिल्हाध्यक्षावर गुन्हा नोंदण्याची मागणी केली . जिल्हाध्यक्ष सुनील राऊत हे आपल्या वर्धा येथील निवासस्थानी असताना देखील त्यांच्याविरुद्ध षडयंत्र करत गुन्हा नोंदविण्याची मागणी करणारे हे राष्ट्रवादीचे नेते म्हणून घेणारे आम्ही आमच्या कार्यकर्त्याच्या बचावासाठी आलो असे सांगत होते मात्र यात मनीष गांधी नावाच्या व्यक्तीला आजपर्यंत अनेक लोकांनी त्यांच्याकडून होत असलेल्या वागणुकी बाबत चोप देत मारहाण केली आहे. यादरम्यान एकही वेळा हे नेते आपल्या कार्यकर्त्याच्या बचावासाठी म्हणून पुढे आले नाही असाही आरोप अतुल वांदिले यांनी केला. मनीष गांधी नावाच्या कार्यकर्त्याचा दारू पिऊन धिंगाणा घालणे, लोकांकडून खंडणी मागण्याचा व्यवसाय आहे. मागे काही महिन्यापूर्वी याच मनीष गांधी नावाच्या कार्यकर्त्यांनी खंडणी मागितल्याने एका युवकांनी विष प्राशन करून स्वतःचा जीव संपवण्याचा प्रयत्न देखील केला होता असाही आरोप पत्रकार परिषदेत केला गेला.

अशा लोकांकडून होत असलेल्या प्रकारांना आम्ही घाबरत नाही यामुळे मात्र पक्षाची प्रतिमा मलिन होत असल्याने अशा प्रकारच्या समाजविधातक वर्तनाला खतपाणी घालणाऱ्या नेतेमंडळीचा निषेध करतो व भविष्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून भक्कम बांधणी करण्याचा सातत्याने प्रयत्न करत राहू पक्षाची ताकद वाढवू असे पत्रकार परिषदेत अतुल वंदिले यांनी सांगितले. यावेळी वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, जिल्हा उपाध्यक्ष प्रलय तेलंग, तालुकाध्यक्ष महेश झोटिंग, अशोक वांदिले, अशोक डगवार, संतोषराव तिमांडे, राजेश धोटे, प्रशांत घवघवे, मंगेश गिरडे, गजू शेंडे, संजय लोणकर, गणेश वैरागडे, वैभव चौधरी, सुभाष चौधरी, दशरथ ठाकरे, सतीश उईके , संतोष घोडे, अरुण सावरकर, जावेद मिर्च , तुषार थुटे, संदीप उईके, यांच्यासह अनेक कार्यकर्ते या उपस्थित होते.

# व्याजदर जैसे थे राहण्याची शक्यता

## मंगळवारपासून तीन दिवस पतधोरण समितीची बैठक : ८ फेब्रुवारीला निर्णय जाहीर होणार

**मुंबई :** नुकत्याच सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पात लोकप्रिय घोषणा झाल्या नसून पूर्ण अर्थसंकल्पात घोषणा करण्यात येणार आहे. सरकारच्या या धोरणाचा भाग म्हणून भारतीय रिझर्व्ह बँक पुढील आठवड्यात होणाऱ्या पतधोरण समितीच्या बैठकीत कर्जावरील व्याजदरात बदल न करता ते कायम ठेवण्याची शक्यता आहे. किरकोळ महागाई अजूनही त्याच्या दिलासादायक पातळीच्या आता असली तरी महागाई वाढण्याचा धोका लक्षात घेऊन व्याजदर 'जैसे थे' राहण्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

रिझर्व्ह बँकेने अल्प-मुदतीचा कर्ज दर किंवा रेपो दर ६.५ टक्क्यांवर स्थिर ठेवला आहे. गेल्या जवळपास एक वर्षापासून व्याजदर स्थिर आहेत. मुख्यत्वे जागतिक घडामोडींमुळे चाललेली किरकोळ महागाई रोखण्यासाठी कर्जावरील व्याजदर फेब्रुवारी २०२३ मध्ये ६.२५ टक्क्यांवरून ६.५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. चालू आर्थिक वर्षात किरकोळ चलनवाढीचा दर जुलै २०२३ मध्ये ७.४४ टक्क्यांच्या उच्च पातळीवर गेल्यानंतर घसरला असला तरी तो अजूनही उच्च म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये ५.६९ टक्के होता. हा व्याजदर रिझर्व्ह बँकेच्या ४-६ टक्क्यांच्या दिलासादायक पातळीत आहे.

आरबीआय गव्हर्नरच्या अध्यक्षतेखाली पतधोरणविषयक धोरण समिती (एमपीसी)ची तीन दिवसांची बैठक ६ फेब्रुवारीला सुरू होईल. या बैठकीत व्याजदरासंदर्भात चर्चा होणार आहे. गव्हर्नर शक्तीकांत दास ८ फेब्रुवारीला सहा सदस्यीय समितीच्या बैठकीतील निर्णय जाहीर करतील. आर्थिक वर्ष २४ साठी जीडीपी आणि किरकोळ महागाईवाढीच्या अंदाजात काही सुधारणा होतात का हे पाहणे मनोरंजक ठरेल. तसेच, आर्थिक वर्ष २५ मध्ये जीडीपी वाढ कशी होईल हे पाहणे गरजेचे आहे कारण अर्थसंकल्पाने रूपरेषा ठरवून दिली आहे, असे ते म्हणाले. ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) वर आधारित किरकोळ चलनवाढ दोन्ही बाजूंनी २ टक्क्यांच्या मार्जिनसह ४ टक्के राहील याची खात्री करण्यासाठी सरकारने मध्यवर्ती बँकेला आदेश दिले आहेत.

गोल्डमन सॅक्सच्या अहवालात आरबीआयने कॅलेंडर २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीपर्यंत पॉलिसी रेपो दरात बदल न होण्याची अपेक्षा केली आहे. कॅलेंडर वर्ष २०२४ मध्ये किरकोळ महागाई अजूनही आरबीआयच्या उद्दिष्टापेक्षा जास्त आहे, आम्ही आमचा दृष्टिकोन ठेवतो की, आरबीआय ८ फेब्रुवारीच्या धोरणात्मक बैठकीत पॉलिसी रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवेल आणि चार टक्के महागाई लक्ष्याचा पुनरुच्चार करेल. आरबीआयने तरलतेची कडक भूमिका कायम ठेवण्याची आमची अपेक्षा आहे, असे त्यात म्हटले आहे.




### ऑगस्टमध्ये व्याजदर कपातीची अपेक्षा

आरबीआयकडून पतधोरणविषयक धोरणावरील अपेक्षांबाबत अदिती नायर, चीफ इकॉनॉमिस्ट, हेड रिसर्च अँड आऊटरीच, इक्रा यांनी सांगितले की, सीपीआय-आधारित चलनवाढ आर्थिक वर्ष २५ मध्ये मध्यम राहण्याची अपेक्षा आहे, जरी मान्सून कमी झाला तरी. आम्ही आगामी आढाव्यात व्याजदरांमध्ये किंवा भूमिकेत कोणत्याही बदलाची अपेक्षा करत नाही. आमची आधारभूत अपेक्षा अशी आहे की, ऑगस्ट २०२४ मध्ये पूर्वीच्या पुनरावलोकनात भूमिका बदलून दर कपात होईल.



अर्थमंत्री निर्मला सीतारामन १२ फेब्रुवारी रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय मंडळाला संबोधित करणार आहेत आणि त्यांनी १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर केलेल्या अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्पातील प्रमुख मुद्यांवर भर देणार आहेत. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या संचालक मंडळाला संबोधित करण्याची प्रथा आहे.

हाऊसिंग डॉट कॉमचे ग्रुप सीईओ ध्रुव अग्रवाल यांनाही आगामी पतधोरण बैठकीत रिझर्व्ह बँकेकडून रेपो दर सध्याच्या पातळीवर कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. हा निर्णय रिझर्व्ह बँकेचा सावध दृष्टिकोन प्रतिबिंबित करतो कारण तो आर्थिक वाढीला चालना देणे आणि महागाई नियंत्रणात ठेवणे यामधील नाजूक समतोल साधतो. महागाई ६ टक्क्यांच्या वरच्या मर्यादा ओलांडण्याची सतत जोखीम असल्याने व्याजदर कपातीची शक्यता नाही. या आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात, एकदा महागाई आणखी कमी होण्याची चिन्हे आहेत. मात्र, सध्या तरी व्याजदर कायम ठेवले जील, असे मत त्यांनी व्यक्त केले. मे २०२२ मध्ये अचानक बैठक घेऊन एमपीसीने पॉलिसी रेट ४० बेसिस पॉइंटने वाढवला आणि त्यानंतर फेब्रुवारी २०२३ पर्यंतच्या प्रत्येक पाच बैठकांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली. मे २०२२ आणि फेब्रुवारी २०२३ दरम्यान रेपो रेट २५० बेसिसने वाढवण्यात आला.



बँक ऑफ बडोदाचे मुख्य अर्थतज्ज्ञ मदन सबनवीस म्हणाले की, एमपीसीच्या बैठकीत व्याजदरात बदल न करण्याची शक्यता आहे. डिसेंबरच्या आकडेवारीनुसार, महागाई अजूनही जास्त आहे आणि अन्नपदार्थांचे दरवाढण्याचा दबाव आहे. किरकोळ अद्याप महागाई कमी झाली नाही. त्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या महागाईवाढीच्या अंदाजानुसार जून अखेरपर्यंत तो ५ टक्क्यांवर राहील आणि नंतर त्यात घसरण येईल. महागाई आणखी जास्त असल्याने यावेळी दर कपातीचा विचार करण्याचा कमी दबाव आहे. वास्तविक आरबीआयने सूचित केले आहे की, व्याजदरांमध्ये २५० बीपीएस वाढ झाल्यानंतर त्यात कपात फारशी झालेली नाही आणि त्यामुळे किमान व्याजदर 'जैसे थे' ठेवणे शक्य आहे, असे सबनवीस म्हणाले.

## सरकारी तेल कंपन्या करणार १.२० लाख कोटींची गुंतवणूक

**नवी दिल्ली :** ओएनजीसी, आयओसी आणि इतर सरकारी तेल कंपन्या येत्या १ एप्रिलपासून तेल आणि वायू उत्खननात सुमारे १.२० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत.

अर्थसंकल्प २०२४-२५ दस्तावेजानुसार २०२४-२५ मध्ये प्रस्तावित केलेली गुंतवणूक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षात सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी खर्च केलेल्या १.१२ लाख कोटींपेक्षा ५ टक्के जास्त आहे. ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पने पुढील आर्थिक



वर्षात ३०,८०० कोटींचा नियोजित भांडवली खर्च केला आहे. तेल आणि वायूचे नवीन साठे शोधण्यात आणि त्यांनी आधीच लावलेले उत्पादन शोध लावण्यासाठी हा खर्च २०२३-२४ आर्थिक वर्षात रु. ३०,५०० कोटी भांडवली खर्चापेक्षा किंचित जास्त आहे. ओएनजीसी विदेश लि. २०२४-२५ मध्ये परदेशातील तेल आणि वायू ऑपरेशन्समध्ये मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ६८ टक्के अधिक ५,५८० कोटी रुपयांची गुंतवणूक करेल. तर इंडियन ऑइल कॉर्पोरेशन ३०,९१० कोटींच्या गुंतवणुकीसह सर्वात जास्त खर्च करणारी असेल. मात्र, चालू २०२३-२४ आर्थिक वर्षातील ३१,२५४ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने ३० टक्के जास्त भांडवली खर्च १३ हजार कोटी रुपये प्रस्तावित केला आहे. गॅस युटिलिटी गेल इंडिया लि. ची नियोजित गुंतवणूक २०२४-२५ मध्ये रु. ८ हजार कोटींहून कमी होऊन २०२४-२५ मध्ये रु. ९,७५० कोटींहून अधिक होईल.

## एफपीआयची कर्ज बाजारातील गुंतवणूक वाढली



### जानेवारीत १९,८०० कोटींपेक्षा जास्त

**नवी दिल्ली :** विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांची (एफपीआय) देशातील कर्ज बाजारात गुंतवणूक वाढत असून जानेवारीमध्ये १९,८०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. जेपी मॉर्गन इंडेक्समध्ये भारत सरकारच्या रोख्यांच्या समावेशाच्या पार्श्वभूमीवर गेल्या सहा वर्षांहून अधिक काळातील सर्वाधिक मासिक प्रवाह आहे. दुसरीकडे, यूएसमध्ये वाढत्या रोख्यांच्या उत्पन्नामुळे त्यांनी गेल्या महिन्यात २५,७४३ कोटी रुपये भारतीय शेअर बाजारातून काढले. डिपॉझिटरीजच्या आकडेवारीनुसार, एफपीआयने जानेवारीमध्ये कर्ज बाजारात १९,८३६ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक केली. जून २०१७ नंतरचा हा सर्वाधिक ओघ होता, जेव्हा त्यांनी २५,६८५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली.

याआधी एफपीआयने डिसेंबरमध्ये कर्ज बाजारात १८,३०२ कोटी रुपये, नोव्हेंबरमध्ये १४,८६० कोटी रुपये आणि ऑक्टोबरमध्ये ६,३८१ कोटी रुपये गुंतवणूक केली होती. जेपी मॉर्गन इंडेक्समध्ये भारतीय सरकारी बाँड्सचा समावेश केल्यामुळे भारतीय स्थिर उत्पन्न बाजारांनी जानेवारीमध्ये एफपीआयकडून २.३९ अब्ज डॉलर्सची मजबूत गुंतवणूक झाली, असे हिमांशू श्रीवास्तव, सहयोगी संचालक-व्यवस्थापक संशोधन, मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंट रिसर्च इंडिया, म्हणाले.

जेपी मॉर्गन चेस अँड कंपनीने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये जाहीर केले की ते जून २-२४ पासून बेंचमार्क इमर्जिंग मार्केट इंडेक्समध्ये भारतीय सरकारी रोख्यांचा समावेश केला जाईल. पुढील १८ ते २४ महिन्यांत सुमारे २०-४० अब्ज अमेरिकन डॉलर्स आकर्षित केली असून जेपी मॉर्गन इंडेक्समध्ये भारतीय सरकारी रोख्यांच्या समावेशामुळे भारताला फायदा होईल, अशी अपेक्षा आहे. या प्रवाहामुळे भारतीय सरकारी रोखे विदेशी गुंतवणूकदारांसाठी अधिक लाभदायी ठरतील आणि रुपयाला बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असेही ते म्हणाले.

शिवाय, बाजार तज्ज्ञांनी सांगितले की, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे वित्तीय तूट कमी करून आर्थिक वर्ष २५ साठी सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ५.१ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट कर्ज बाजारासाठी स्पष्टपणे सकारात्मक आहे. अंतरिम अर्थसंकल्पात सीतारामन यांनी लोकप्रिय घोषणा टाळल्या. त्या म्हणाल्या की, २०२४-२५ साठी वित्तीय तूट जीडीपीच्या ५.१ टक्के असण्याचा अंदाज चालू आर्थिक वर्षातील ५.८ टक्के आहे. एकूणच, २०२३ साठी एकूण एफपीआय प्रवाह इक्विटीमध्ये रु. १.७१ लाख कोटी आणि कर्ज बाजारात रु. ६८,६६३ कोटी होता. या दोघांनी मिळून भांडवली बाजारात २.४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली.

२०२२ मध्ये जागतिक स्तरावर मध्यवर्ती बँकांनी केलेल्या आक्रमक दरवाढीमुळे १.२१ लाख कोटी रुपये काढण्यात आले.

### आठ कंपन्यांचे बाजारमूल्य २.९० लाख कोटींनी वधारले

शेअर बाजारातील आशावादामुळे रिलायन्स इंडस्ट्रीज आघाडीवर राहिल्याने गेल्या आठवड्यात आघाडीच्या १० कंपन्यांपैकी आठ कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य २.९० लाख कोटी रुपयांनी वधारले. गेल्या आठवड्यात बीएसई सेन्सेक्सने १,३८४.९६ अंकांची किंवा १.९५ टक्क्यांनी उसळी घेतली. आघाडीच्या १० कंपन्यांमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, इन्फोसिस, एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि हिंदुस्तान युनिलिव्हर यांच्या बाजारमूल्यात वाढ झाली. तर भारती एअरटेल आणि आयटीसी यांच्या बाजारमूल्यात घसरण झाली. आठ कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य २,९०,२६७.९८ कोटी रुपयांनी वाढले.

## एसबीआयच्या तिमाही नफ्यात ३५ टक्के घट

### पगार, पेन्शन थकबाकीसाठी तरतुदीमुळे ९,१६४ कोटींचा नफा

**मुंबई :** पगार आणि निवृत्तीवेतनासाठी केलेल्या ७,१०० कोटी रुपयांच्या एकरकमी तरतुदीमुळे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नफ्यात ३५ टक्क्यांनी वाढ झाली असून डिसेंबर तिमाहीत तो ९,१६४ कोटी रुपयांवर आला आहे. देशातील सर्वात मोठ्या बँकेने शनिवारी ही घोषणा केली.

कर्मचारी संघटनांसोबत झालेल्या १७ टक्के वेतन सेटलमेंटमधून उद्भवलेल्या पगार आणि निवृत्तीवेतनासाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण अतिरिक्त तरतुदींची काळजी घेणारी ही एकवेळ तरतूद नसती तर निव्वळ नफा १६,२६४ कोटी रुपये झाला असता, असे एसबीआयचे अध्यक्ष




दिनेशकुमार खारा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. कर्जामध्ये जवळपास १५ टक्के वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर अध्यक्षांनी सांगितले की, मला पत पातळीत आणखी होईल, असा विश्वास आहे. कारण चौथी तिमाहीत हा बँक ४.५ लाख कोटींच्या कर्ज वितरण करण्याची अपेक्षा आहे.

भांडवल उभारणीच्या गरजेबद्दल, ते म्हणाले की, गरज भासल्यास आम्ही भांडवल वाढविण्याकडे लक्ष देऊ. परंतु आमचा नफा लक्षात घेता आम्ही निधीसाठी मूळ भांडवलात ४० हजार कोटी रुपये सहजपणे परत करू शकतो. त्याशिवायही आमच्याकडे अतिरिक्त ७.५ लाख कोटी रुपये कर्ज देण्याची तरलता आहे.

## धोरणात्मक विक्री पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करेल

### डीआयपीएएम सचिव तुहिन पांडे यांची माहिती



**नवी दिल्ली :** गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग (डीआयपीएएम) आयडीबीआय बँक आणि बीईएमएलसारख्या चालू खासगीकरण व्यवहार पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करेल आणि पुढील आर्थिक वर्षात धोरणात्मक विक्रीसाठी कोणत्याही नवीन सीपीएसईकडे लक्ष देणार नाही, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

डीआयपीएएम सचिव तुहिन कांता पांडे यांनी पीटीआयला दिलेल्या

# दारिद्र्य खरोखरच घटतेय का?



गरिबी निर्मूलन अभियानामुळे गरिबीमध्ये लक्षणीय प्रमाणात घट झाली; मात्र उत्पन्नात असमानता आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसह अन्य जागतिक संघटनांनीदेखील भारताच्या खाद्य सुरक्षा योजनेचे कौतुक केले आहे. सरकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेने मोलाची भूमिका बजावल्याने अतिगरीब श्रेणीतही घट झाली आहे. मात्र असे लोक लगेच दारिद्र्यरेषेच्या वर आले, असे सरसकटपणे म्हणता येणार नाही.

२०१५-१६ च्या तुलनेत २०१९-२१ या काळात भारतातील गरिबी २५ टक्क्यांनी कमी होऊन १५ टक्क्यांवर आली आहे. 'गरिबी निर्मूलन अभियाना'च्या माध्यमातून भारतातील गरिबीमध्ये घट झाली आहे; मात्र अजूनही उत्पन्नात असमानता आहे. विशेष म्हणजे आशिया पॅसिफिक ह्युमन डेव्हलपमेंट अहवालानुसार भारतातील प्रति व्यक्तीचे उत्पन्न वाढले आहे. भारतात १० सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम (एनएएफएसए) लागू करण्यात आला असून त्याचा उद्देश नागरिकांना सन्मानाने जगता यावे, परवडणाऱ्या किमतीमध्ये गुणवत्तापूर्ण पाच किलो खाद्यान्न उपलब्ध करून देणे असा आहे. त्यानुसार रेशन कार्डधारकांना तीन रुपये किलो दराने तांदूळ, दोन रुपये किलो दराने गहू, एक रुपये किलो दराने कडधान्य असे खाद्यान्नाचे वितरण सुरू झाले. केंद्र सरकारने मोफत धान्य योजनेत धान्य वितरण योजना समाविष्ट केली. केंद्र सरकारने तांदूळ आणि गव्हाला राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियमानुसार अनुक्रमे तीन रुपये आणि दोन रुपये प्रति किलो दराने विकण्याऐवजी मोफत देण्याचे ठरवले. आता २०२८ पर्यंत राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियमानुसार ही योजना राबवण्यात येणार आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसह जगातील विविध सामाजिक सुरक्षा पाहणाऱ्या जागतिक संघटनांनीदेखील भारताच्या खाद्य सुरक्षा योजनेचे कौतुक केले आहे. जागतिक नाणेनिधीच्या संशोधन अहवालात कोरोनाच्या पहिल्या लाटेचा (२०२०-२१) अभ्यास करण्यात आला. त्यानुसार नमूद करण्यात आले की, सरकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेने लॉकडाऊनच्या काळात गरीब जनतेवर होणारा तीव्र परिणाम कमी करण्यात मोलाची भूमिका बजावली. परिणामी अति गरीब श्रेणीतही घट झाली आहे.

अन्नधान्य अनुदान कार्यक्रमाला कोरोनाचा काळ वगळता अन्य काळातही गरिबीत घट करण्यात यश मिळाले आहे. जगभरातील अर्थतज्ज्ञदेखील कोरोनाकाळात भारतातील अन्नधान्याचे उत्पादन ऐतिहासिक पातळीवर पोचल्याचा उल्लेख करत आहेत. या विक्रमी उत्पादनामुळे देशातील ८० कोटी जनतेला सातत्याने मोफत धान्य उपलब्ध करून देता आले, असे म्हणत आहेत. परिणामी, बहुसंख्य जनता गरिबीच्या दलदलीत अडकण्यापासून वाचली. देशातले विक्रमी पातळीवरचे धान्योत्पादन पाहता भारताची अन्नसुरक्षाही मजबूत होत आहे. २०२२-२३ मध्ये ३३०५.३४ लाख टन खाद्यान्न उत्पादनाचा अंदाज होता; पण २०२३-२४ मध्ये मात्र गहू आणि डाळीच्या उत्पादनात घट होण्याचे संकेत मिळत आहेत. अशा वेळी खाद्य सुरक्षेबरोबरच वाढत्या लोकसंख्येसाठी खाद्यान्नाची गरज वाढणार आहे. आजपर्यंत खाद्यान्नाच्या केंद्रीय निकषानुसार वार्षिक ७८० ते ८०० लाख टन गहू आणि तांदळाची खरेदी केली जात होती; मात्र वाढती लोकसंख्या पाहता धान्य खरेदीचे प्रमाण वाढवणे निकडीचे आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीनुसार धान्य वितरणासाठी आणखी ५०० ते ५९० लाख टन धान्यांची गरज आहे. २०२३-२४ मध्ये केंद्राने मोफत वाटपासाठी ६०० लाख टन गहू अणि तांदळाचा पुरवठा केला आहे. अशा वेळी देशाला अधिक खाद्यान्न उत्पादनाची गरज आहे. तेव्हा खाद्यान्नांची नासाडी टाळण्यासाठी साठवण क्षमता, गोदामाची क्षमता वाढवणेदेखील गरजेचे आहे.

आमच्या सरकारने दहा वर्षांची कारकीर्द ही गरीबांसाठी समर्पित केली आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच काढले. 'प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियानां'तर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनेमधून एक लाख आदिवासी लाभार्थ्यांना ५४० कोटी रुपयांचा पहिला हप्ता ऑनलाईन प्रणालीद्वारे वितरीत केल्यानंतर ते बोलत होते. विविध कल्याणकारी योजना सर्वांपर्यंत पोहोचल्या, तरच देशाचा विकास होऊ शकतो. प्रत्येकाला, अगदी दुर्गम भागातील रहिवाशांनाही त्याचा लाभ पोहोचेल, ही सरकारची पक्की हमी असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्या कारकीर्दीत देशातील गरीबांचे प्रमाण २४ कोटींनी कमी झाले आणि यापूर्वी इतक्या प्रमाणात गरिबी निर्मूलन कधीही झाले नव्हते, असा दावाही त्यांनी केला. अर्थात याबाबतीत अगोदरच्या मनमोहन सिंग सरकारने अधिक सरस कामगिरी केली होती, असा दावाही करण्यात आला आहे. याविषयी जागतिक स्तरावर काम करणाऱ्या अर्थतज्ज्ञांमध्येही उलटसुलट चर्चा सुरू आहे, बौद्धिक वाद झडत आहेत. परंतु हा विषय बाजूला ठेवला तरी गरीबांच्या जीवनावर देशातील महागाईचा परिणाम होत असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. किरकोळ महागाईनंतर, घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित घाऊक महागाई दरातही वाढ नोंदवण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२३ मध्ये घाऊक महागाईचा दर ०.७३ टक्के नोंदवण्यात आला असूनही या दराची नऊ महिन्यांमधील उच्चांकी पातळी आहे. भाज्या, फळे, दूध, अंडी आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमतीमध्ये झालेली वाढही याला कारणीभूत ठरली आहे.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि प्रकल्प अंमलबजावणी मंत्रालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार,

**परामर्ष**



▪ हेमंत देसाई

गेल्या डिसेंबरमध्ये किरकोळ किमतींवर आधारित, म्हणजेच ग्राहक निर्देशांकावर आधारित चलनवाढ ५.७ टक्के इतकी होती. सर्वसामान्य माणसाचा या निर्देशांकाशी अधिक संबंध असतो. अर्थव्यवस्थेला लागू असलेले व्याजदर वाढवायचे, कमी करायचे की स्थिर ठेवायचे, हे रिझर्व्ह बँक ठरवते आणि त्यासाठी किरकोळ किंमत निर्देशांकाचा आधार म्हणून विचार करत असते. कारण सर्वसामान्य व्यक्ती घरासाठी, कारसाठी किंवा अन्य किरकोळ कारणांसाठी कर्ज घेते, तेव्हा तिला दरमहा व्याज द्यावे लागते. रिझर्व्ह बँक कोणता व्याजदर निश्चित करते यावर हे मासिक हप्ते अवलंबून असतात. चलन फुगवट्याचा दर हा केवळ एका वस्तूशी निगडित नसतो तर तो सर्वसाधारण किंमत पातळी दर्शवत असतो. म्हणजेच अनेक वस्तूंचा त्यात समावेश केलेला असतो. चलनवृद्धीचा दर जाहीर केला जातो, तेव्हा त्यावरून सर्वसाधारण किंमत पातळीत किती वाढ किंवा घट झाली आहे, हे दर्शवले जात असते. चलन फुगवट्याचा दर चार टक्क्यांच्या कक्षेत असावा, असे रिझर्व्ह बँकेने ठरवले आहे. त्यामुळे ५.६ टक्के इतका चलन फुगवटा झाला आहे. म्हणजेच लक्ष्मणरेषा ओलांडली आहे, हे स्पष्ट दिसते. खरे तर गेल्या सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये चलन फुगवटा दर पाच टक्क्यांच्या खाली गेला होता. परंतु नोव्हेंबरमध्ये तो साडेपाच टक्क्यांवर जाऊन पोहोचला.



२०१९ च्या उत्तरार्धानंतर किरकोळ ग्राहक मूल्य निर्देशांक एकाही महिन्यात चार टक्क्यांच्या खाली आलेला नाही. याचा अर्थ, केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँक हे भाववाढीबद्दल दिलेले आश्वासन पूर्ण करू शकलेले नाहीत. अर्थात त्याच वेळी रिझर्व्ह बँकेने एक वैधानिक तरतूद अशी करून ठेवली आहे की चलनवृद्धीचा दर जास्तीत जास्त सहा टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. म्हणजे चार टक्क्यांची कक्षा सहा टक्क्यांपर्यंत विस्तारली तरी चालेल. त्यामुळे आभाळ कोसळणार नाही, असे धोरण आहे किंवा तसा कायदा आहे. परंतु गेल्या चार वर्षांमध्ये बहुतांश वेळा किरकोळ महागाई सहा टक्क्यांच्या पलीकडे गेली होती. याचे कारण कोविडमुळे अन्नधान्य, फळे, भाज्या आणि इतर दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या पुरवठ्यात बाधा येत होती. अनेक ठिकाणी मागणीच्या तुलनेत पुरवठा होत नसल्यामुळे, भाव वर गेले होते. त्याचप्रमाणे कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाला फटका बसला होता. आता चार टक्क्यांची लक्ष्मणरेषा निश्चित करण्यात आली आहे. याचा अर्थ वस्तूंची भाववाढ दरवर्षी चार टक्क्यांपर्यंत झाली तरी चालेल. म्हणजेच पाच वर्षांमध्ये सर्वसाधारण किंमत पातळी २० टक्के आणि दहा वर्षांमध्ये ४० टक्क्यांनी वाढली तरी चालू शकते. आणखी तपशिलात जाऊन पाहिले तर लक्षात येते की, २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत किंमत पातळी २४ टक्क्यांनी वाढली. चालू आर्थिक वर्षात चलन फुगवटा साडेपाच टक्के दराने झाला, तर २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत किमती एकूण ३२ टक्क्यांनी वाढल्या.

एप्रिल २०१४ च्या तुलनेत गेल्या पाच वर्षांमध्ये एकूण ६४ टक्के भाववाढ झाली आहे. त्या प्रमाणात सर्वसाधारण माणसाचे बजेट कोलमडून गेले आहे. त्या प्रमाणात देशातील लोकांचे पगार किंवा उत्पन्न वाढले नसेल, तर त्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली असणार. २०१४ पासून व्यक्तींचे उत्पन्न ६४ टक्क्यांनी वाढले नसेल, तर त्यांना किंमतवाढीचा फटका बसला असणार, असा याचा अर्थ आहे. म्हणजे लगेच ते दारिद्र्यरेषेखाली गेले, असे सरसकटपणे म्हणता येणार नाही. परंतु आज देशात सर्वाधिक प्रमाणात असलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दिवसेंदिवस घट होत चालली आहे. कारण दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे शेतीचे नुकसान होत आहे आणि शेतमालाला वाजवी भावही मिळत नाहीत. तसेच यांत्रिकीकरणामुळे नवीन कारखान्यांमध्ये अपेक्षित प्रमाणात रोजगार निर्माण होत नाही. हे सर्व घटक विचारात घेतले, तर परिस्थिती काळजी करावी अशीच आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

---

# कृत्रिम स्टार्टअपला एआय युनिकॉर्नचा दर्जा



**भारताने** कृत्रिम बुद्धिमत्ते (एआय) च्या शर्यतीत मोठे यश मिळवले आहे. 'एआय स्टार्टअप कृत्रिम'ला देशातील पहिल्या 'एआय युनिकॉर्न'चा दर्जा मिळाला आहे. 'ओएलए'चे सीईओ भाविश अग्रवाल यांच्या 'कृत्रिम एआय स्टार्टअप'ला पन्नास दशलक्ष निधी मिळाला आहे.

मॅट्रिक्स पार्टनर्स इंडिया आणि इतर गुंतवणूकदारांनी 'कृत्रिम'चे बाजार मूल्य एक अब्ज डॉलर ठेवले आहे. यासह ते देशातील पहिले 'एआय युनिकॉर्न स्टार्टअप' ठरले आहे. 'एआय स्टार्टअप आर्टिफिशियल'ने एक महिन्यापूर्वी आपले भाषा मॉडेल लाँच केले होते. कृत्रिम कंपनी मॉडेल केवळ भाषांपुरते मर्यादित नाही. हे स्टार्टअप डेटा सेंटर विकसित करत आहे. या कंपनीची 'एआय इको सिस्टीम'साठी सर्व्हर आणि सुपर कॉम्प्युटर तयार करण्याची योजना आहे. भाविश अग्रवाल यांनी 'एक्स'वर पोस्ट केले की 'कृत्रिम'ने आपली पहिली फंडिंग फेरी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. हा केवळ कंपनीसाठीच नाही, तर भारतासाठीही ऐतिहासिक क्षण आहे. भारताला स्वतःचे 'एआय' तयार करावे लागेल. हे स्वप्न कृत्रिम बुद्धिमतेच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.

अग्रवाल पुढे म्हणतात की, भारतीय डेटावर लक्ष केंद्रित करून कृत्रिम बुद्धिमत्तेला दोन ट्रिलियनपेक्षा जास्त टोकन्सवर प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रारूपाची अनेक भारतीय भाषांमध्ये काम करण्याची ताकद आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स अनेक भारतीय भाषा समजून घेऊ शकतेच, पण त्यामध्ये सहज प्रतिसाद देण्याची क्षमतादेखील आहे. त्याच्या भाषा मॉडेलमध्ये सध्या आर्टिफिशियल बेस आणि आर्टिफिशियल प्रो यांचा समावेश आहे. आम्ही हे मल्टीमोडल वैशिष्ट्यांसह आणि सर्वसमावेशक ज्ञानक्षमतेसह विकसित केले आहे. हे मॉडेल एकापेक्षा अधिक भाषांमध्ये सहजपणे स्विच करू शकते.

---

# दिग्गज कंपनीकडून नोकरकपात

**सध्या** विविध क्षेत्रांमध्ये नोकरकपातीचे संकट आहे. आता आणखी एका दिग्गज कंपनीकडून मोठी नोकरकपात करण्यात येणार आहे. यूपीएस ही जगातील सर्वात मोठी पार्सल डिलिव्हरी कंपनी हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्याच्या तयारीत असल्याची आहे. हे वृत्त एकाच कंपनीबद्दल भाष्य करत असले तरी नोकरकपातीची वावटळ कशी घोंघावत आहे, हे समजू शकते.

युनायटेड पार्सल सर्व्हिस (यूपीएस) या जगातील सर्वात मोठ्या पार्सल वितरण कंपनीने बारा हजार कामगारांना कामावरून कमी करण्याची तयारी केली आहे. याशिवाय कंपनी आपल्या 'कोयोट' या ट्रक फ्रेट ब्रोकरेज व्यवसायासाठीही कठोर निर्णय घेण्याच्या विचारात असल्याची माहिती आहे. 'कोयोट' ट्रकलोड फ्रेट ब्रोकरेज व्यवसायासाठी धोरणात्मक पर्यायांचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न करत आहे. कंपनीचा महसूल अपेक्षेपेक्षा खाली आल्यानंतर हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.



कंपनीतर्फे बारा हजार कर्मचाऱ्यांना कमी करण्याच्या बातमीमुळे सर्वच क्षेत्रांमध्ये खळबळ माजली आहे. गेल्या काही महिन्यांत नाईकी तसेच गुगलसारख्या मोठ्या कंपन्यांनीही नोकरकपात केली. सध्या नोकरकपातीची टांगती तलवार अनेक क्षेत्रांवर आहे. दरम्यान, नोकरकपातीच्या बातमीनंतर सुरुवातीच्या ट्रेडिंगमध्ये यूपीएसच्या शेअर्समध्ये ६.३ टक्क्यांची तीव्र घसरण झाली. मुख्य कार्यकारी कॅरोल टोम यांनी सांगितले की, मागील वर्ष कठीण आणि निराशाजनक होते. यूपीएसने त्यांच्या सर्व व्यवसाय विभागांमध्ये कमी नफा मिळवला. यूपीएस कंपनीने आता खर्चात एक अब्ज डॉलर्स कपात करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. कंपनीचा पूर्ण वर्षाचा महसूल ९२ अब्ज डॉलर्स ते ९४.५ अब्ज डॉलर्सदरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

'सीएफओ' ब्रायन न्यूमन यांनी सांगितले की, टीमस्टर्स युनियनसोबतच्या नवीन करारामुळे त्याच्या मजुरीचा खर्च वाढत आहे. याशिवाय कंपनीच्या सरासरी ऑर्डर्सही कमी होत आहेत. कंपनीचे ऑपरेटिंग मार्जिन कमी होण्याची अपेक्षा आहे. यूपीएसचा आंतरराष्ट्रीय हवाई-आधारित विभाग आणि ट्रक व्यवसाय चौथ्या तिमाहीमध्ये अनुक्रमे ६.९ टक्के आणि ७.३ टक्के घसरला. कंपनीचा तिमाही महसूल एका वर्षापूर्वी २७ अब्ज डॉलर्सवरून २४.९ अब्ज डॉलर्सवर घसरला. कंपनीचा नफाही गेल्या वर्षीच्या प्रति शेअर ३.६२ डॉलर्सवरून २.४७ डॉलर प्रति शेअरवर घसरला आहे.

---

# कॅश-क्रेडिट अकाऊंट

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग**

प्रसाद नातु



आजपासून तीन सोमवारच्या लेखात आपण कर्जदारांना पुरविण्यात येणाऱ्या काही वेगवेगळ्या कर्ज सुविधांची माहिती घेणार आहोत. त्यातील पहिले म्हणजे कॅश-क्रेडिट अकाऊंट, दुसरे म्हणजे टर्म लोन किंवा मुदती कर्ज अकाऊंट, तिसरे म्हणजे शॉर्ट टर्म लोन अकाऊंट किंवा अल्प मुदती कर्ज अकाऊंट आणि चौथे म्हणजे ओव्हरड्राफ्ट अकाऊंट. त्यापैकी आजच्या लेखात कॅश-क्रेडिट अकाऊंट म्हणजे काय, ते कसे वापरायचे, त्याच्यासाठी कर्जदारांना कुठल्या गोष्टींची पूर्तता करवी लागते आणि इतर नियम यांची चर्चा करणार आहोत.

**कॅश-क्रेडिट अकाऊंट**

हे एक प्रकारे तुमचे सेव्हिंग अकाऊंट जसे तुम्ही वापरता तसेच असते. फक्त यातले पैसे हे तुमचे नसतात तर बँकेने दिलेली एक कर्ज सीमा असते. त्या सीमेच्या आत तुम्हाला रोज पैसे टाकण्याची आणि काढण्याची परवानगी बँकेने दिलेली असते. यातून खालील खर्चाचे पेमेंट करता येते. १. कच्चा मालाच्या खरेदीचे पेमेंट करण्यासः- कॅश-क्रेडिट अकाऊंट हे सामान्यतः खेळत्या भांडवलासाठी उपलब्ध करून दिलेले कर्ज किंवा कर्ज मर्यादा असते. खेळते भांडवल म्हणजे कच्चा माल खरेदीसाठी लागणारा खर्च, यासाठी या खात्यातून तुम्ही चेक देऊ शकता किंवा बँकेला आदेश देऊन एनईएफटी किंवा आरटीजीएसद्वारे ज्याच्याकडून कच्चा माल खरेदी केला, त्याला पेमेंट करू शकता. पूर्वी यासाठी डिमांड ड्राफ्टचा देखील वापर केला जायचा. पण डिमांड ड्राफ्टने पैसे मिळण्यास वेळ लागतो. त्यामुळे ग्राहक आजकाल फास्ट ट्रान्सफरचे मध्यम म्हणून एनईएफटी किंवा आरटीजीएसने पैसे पाठवितात.

२. कर्मचाऱ्यांचे आणि ऑफिस स्टाफचा पगार आणि इतर भत्ते यांचे पेमेंट करण्यासाठी. अस्थायी कर्मचाऱ्यांची मजुरी कमी असल्याने बऱ्याच वेळा छोट्या छोट्या रकमा या चेकद्वारे रोकड स्वरूपात दिल्या जातात, कारण ते आस्थापनेवर नसतात. आस्थापनेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सर्वसामान्यपणे ट्रान्स्फर पेमेंट करण्यात येते.

३. विजेच्या बिलाचे भुगतान (पेमेंट):- विजेच्या बिलाचे भुगतान हे चेकद्वारे किंवा एनईएफटी किंवा आरटीजीएसने करण्यात येते.

४. वाहतुकीचा खर्च किंवा वाहनव्ययाचे भुगतान :- कच्चा माल फॅक्टरीमध्ये आणण्यास किंवा पक्का माल गोदामात किंवा खरेदीदाराकडे पोहोचविण्यासाठी जो वाहतुकीचा खर्च येतो. त्याचे पेमेंट हे चेकने याच खात्यातून करण्यात येते.

५. जाहिरातीचा खर्च, टपालाचा खर्च, ऑडिट फीचे भुगतान, फॅक्टरीचा, मशिनरीचा, तसेच फॅक्टरीच्या मालकीच्या बस, ट्रक, कार असल्यास त्याचा, कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा असल्यास विम्याचा प्रीमियमचा खर्च, प्रॉव्हिडंड फंडचा खर्च आणि इतर दैनंदिन खर्च यांचे भुगतान कॅश-क्रेडिट अकाऊंटमध्ये करण्यास बँक परवानगी देत असते. पण यातून कुठल्याही प्रकारच्या वैयक्तिक खर्चाचे पेमेंट करता येत नाही.

कॅश-क्रेडिट अकाऊंटसाठी बँकेचे नियम

१. कॅश-क्रेडिटची मर्यादा ठरविण्यासाठी दर महिन्याचे स्टॉक स्टेटमेंट महिना संपल्यावर एका ठरावीक तारखेपर्यंत बँकेला द्यावी लागते. यात फक्त पेड स्टॉक अर्थात ज्या स्टॉकच्या किमतीचे पेमेंट झाले आहे असा स्टॉक दाखविता येतो. उधारीवर घेतलेल्या स्टॉकचा यात समावेश करता येत नाही. स्टॉक स्टेटमेंटमध्ये कच्चा मालाची किंमत, प्रोसेसमध्ये असलेल्या मालाची किंमत तसेच विकल्या न गेलेल्या फिनिश्ड गुडस किंमत जोडण्यात (Add करण्यात) येते.

२. वेळेवर स्टॉक स्टेटमेंट न दिल्यास तुमची आहारण सीमा म्हणजेच कॅश- क्रेडिट अकाऊंटची लिमिट शून्य करण्याचा बँकेला अधिकार आहे किंवा स्टॉक स्टेटमेंट वेळेवर न देता उशिरा दिले तर दंडीत (Penal) व्याज आकारण्याचा बँकेला अधिकार असतो.

३. काही कॅश-क्रेडिट खात्यात बूक-डेट्स म्हणजे उधारीच्या मूल्यावर कॅश-क्रेडिट अकाऊंट स्वीकृत करण्यात येते. ते बूक-डेट्स किंवा उधारी ही ६० दिवस, ९० दिवस, १२० दिवस की १८० दिवस हे तुमच्या व्यवसायाचे वर्किंग सायकल किती दिवसाचे आहे त्यावर निर्धारित करण्यात येते. बूक-डेट्स स्टेटमेंट वेळेवर न दिल्यास तुमची आहारण सीमा म्हणजेच कॅश- क्रेडिट अकाऊंटची लिमिट शून्य करण्याचा बँकेला अधिकार आहे किंवा बूक-डेट्स स्टेटमेंट वेळेवर न देता उशिरा दिले तर दंडित (Penal) व्याज आकारण्याचा बँकेला अधिकार असतो.

४. या स्टॉक स्टेटमेंटवर बूक-डेट्स स्टेटमेंटवर बँकेच्या रेकॉर्डवर कंपनीचे प्राधिकृत अधिकारी आहेत त्यांची सही, रबर स्टॅम्पसकट असायला हवी.

५. स्टॉक स्टेटमेंट किंवा बूक-डेट्स स्टेटमेंटप्रमाणे बँक आहारण सीमा म्हणजे कॅश-क्रेडिट लिमिट दर महिन्याला निश्चित करण्यात येते. ती जर कमी आली तर त्या सीमेच्या वर आहारित केलेली राशी म्हणजे विड्रॉ केलेली राशी बँकेत भरावी लागते.

६. कॅश-क्रेडिट अकाऊंटमध्ये दर दिवसाला तुमच्या खात्याला जी देय राशी (Outstanding amount) त्या राशीवर व्याज आकारले जाते. म्हणजेच तुमची कॅश-क्रेडिट लिमिट रु. ५०.०० लाख आहे. पण १ तारखेला तुमच्या खात्याला देय राशी रु. ४५.५० लाख आहे. नंतर तुम्ही ५ तारखेला रु. ४.५० काढले तर तुम्हाला १ तारखेपासून ४ तारखेपर्यंत रु. ४५.५० लाखांवर ४ दिवसांचे व्याज आकारले जाते. पाच तारखेपासून ज्या तारखेला तुमचा बॅलेन्स कमी आला असेल तिथपर्यंत रु. ५०.०० लाखांवर आकारले जाते. म्हणून या खात्याला करदारांच्या फायद्याचे खाते समजण्यात येते. कॅश-क्रेडिट खात्यासंबंधात तुम्हाला कुठल्याही शंका असतील तर तुम्ही माझा मेल आईडी pknatoo25360@gmail.com वर आपला प्रश्न पाठवून आपले शंकासमाधान करून घेऊ शकता.

**(लेखक बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त चीफ मॅनेजर आहेत).**

pknatoo25360@gmail.com

# चर्मकार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी 'लिडकॉम आपल्या दारी'–डॉ. धम्मज्योती गजभिये

## कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन





**दैनिक जनप्रभात**
**दिलीप येवले /प्रतिनिधी**
--------------

**नागपूर, ;-** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या वतीने चर्मकार समाजातील होतकरु उमेदवारांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ देण्यात येतो. परंतु ज्या प्रमाणात योजनांचे लाभधारक व्हायला पाहिजे त्याप्रमाणात होत नाहीत. महामंडळाच्या योजनांची माहिती चर्मकार बांधवाना होण्यासाठी गाव व तालुक्यात जनजागृती करण्यासाठी 'लिडकॉम आपल्या दारी' उपक्रम राबविण्यात येत आहे. युवक युवतींनी त्याचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. धम्मज्योती गजभिये यांनी केले. सामाजिक न्याय भवनातील सभागृहात 'लिडकॉम आपल्या दारी' उपक्रमांतर्गत कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिध्दार्थ गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, प्रदीप इंगळे, राज्य समन्वयक हेमंत वाघमारे, जिल्हा प्रकल्प संचालक पंकज ठाकरे, श्रीकांत कुलकर्णी, महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश ढगे, भय्याजी भिकाने, विना भागवतकर उपस्थित होते. महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात कर्ज योजनांच्या अटी व शर्ती शिथील करण्यात आल्या आहेत. कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, अथसहाय्य योजनेत वन टाईम सेटलमेंट योजनेनुसार ५० टक्के कर्ज माफ करण्यात येणार असल्याचे डॉ. गजभिये यांनी सांगितले. उद्योजकता प्रशिक्षणात १ लाख युवक युवतींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचाही लाभ घ्यावा. आपले जीवन सफल बनवावे. चर्मकार समाजाच्या उत्थानासाठी केंद्र व राज्याच्या अनेक योजना आहेत. त्याचा लाभ चर्मकार समाजातील उमदवारांनी घ्यावा. असेही ते म्हणाले.

चर्मकार समाजाच्या उत्थानासाठी शैक्षणिक योजना सुध्दा आहे, सोबतच सर्वांगीण विकासाच्या योजना आहेत. बचत गटाच्या महिला उत्थानासाठी योजनाही आहेत. या योजनेंतर्गत ५० हजारपर्यंत अर्थसहाय दिल्या जाणार आहेत. पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून महिला विकासावर भर देण्यात येणार आहे. ५०० गटई कामगारांना अर्थसहाय्य १० व्यक्तींच्या गटानुसार देण्यात येणार आहे. चर्मकार सामाजाच्या सर्वांगीण विकास करण्याची क्षमता महामंडळामध्ये आहे,यासाठी चर्मकार समाजाचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. चर्मकार समाज मुळताच उद्योजक आहे, त्यांनी इतर उद्योगात सुध्दा प्राविण्य मिळवावे, असे ते म्हणाले. नोकरीच्या संधी सिमीत आहेत. त्यामुळे चर्मकार बंधुनी उद्योग क्षेत्राकडे वळाण्यासाठी सामाजिक मानसिकता बदलविणे आवश्यक असल्याचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिध्दार्थ गायकवाड यांनी सांगितले. स्वत: एखाद्या क्षेत्रात व्यावसायिक बनावे. व्यवसाय कोणीही करु शकतो त्यासाठी व्यवसायाचे ज्ञान असायला पाहिजे. यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. बेरोजगारांसाठी महामंडळ अत्यंत महत्वाचे असून प्रत्येकांनी सक्षम झाले पाहिजे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चर्मोद्योग महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश ढगे यांनी केले. यावेळी प्रदीप इंगळे व विणा भावगवतकर तसेच नवोदित उद्योजकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी लाभार्थ्यांना प्रतिनिधीक स्वरुपात धनादेशाचे वाटप करण्यात आले. तसेच प्रमाणपत्र देण्यात आले. प्रारंभी संत रोहिदास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन तसेच दीप प्रज्वलित करुन कार्यशाळेचा प्रारंभ करण्यात आला. तसेच संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. या कार्यशाळेस चर्मकार समाजातील नागरिक, महिला, होतकरु उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध योजनांचे स्टॉल यावेळी लावण्यात आले होते.

# रिपब्लिकन योद्धा पुरस्काराने संजय गाडे सन्मानीत

**दैनिक जनप्रभात**
**जीवन मोहिते /प्रतिनिधी**
---------------

**सातारा :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवईगटाचे जिल्हाध्यक्ष संजय गाडे यांना बंधुत्व रिपब्लिकन योद्धा पुरस्कार देवुन सन्मानीत करण्यात आले.

आंबेडकर चळवळीमध्ये अग्रभागी राहून अन्याय-अत्याचार विरोधार्थ लढणाऱ्या योद्ध्यांना आतापर्यंत बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर यांनी गौरविले आहे. यापूर्वी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष तथा पर्यावरण संरक्षण समितीचे अध्यक्ष अशोकबापू गायकवाड यांना बंधुत्व पुरस्कार वितरीत करण्यात आला होता.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष युवाशाहिर वैभव गायकवाड व वंचितच्या युवा जिल्हा महासचिव सायली भोसले यांना बंधुत्व युवा पुरस्कार वितरित करण्यात आला होता. रिपब्लिकन सेनेचे पाश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष चंद्रकांतआप्पा




खंडाईत यांना बंधुत्व पुरस्कार देऊन सन्मानीत केले होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)चे जिल्हाध्यक्ष तथा राज्य उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांनाही बंधुत्व रिपब्लिकन योद्धा पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे.याशिवाय विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या महनीय व्यक्ती व संस्थानाही सन १९९१ पासून गौरविण्यात आले आहे.

''संजय गाडे यांची ओळख अभ्यासपूर्ण आक्रमक म्हणून आहे. फणसाप्रमाणे ते वरून दिसतात.अन्यायग्रस्थाना न्याय देण्यासाठी ते मनापासून पुढे असतात.''असे अनिल वीर यांनी पुरस्कार वितरणप्रसंगी सांगितले. संजय गाडे म्हणाले,'' निसर्गाच्या नियमाप्रमाणे आपण स्वत:मध्ये धम्मानुसार २३ वर्षांपूर्वीच बदल करवुन घेतला.तेव्हा कार्यकर्त्यांनी परिवर्तनवादी पुस्तके वाचनात आणली पाहिजे तरच आधुनीक समाजनिर्मिती चळवळीच्या माध्यमातून करता येईल.'' विशाल कांबळे आणि त्यांचे सहकारी यांनी स्वागत केले. यावेळी रिपब्लिकन योद्धा, टायगर जिंदा है। आंदोलनाचा बादशहा आदी उपाध्या देऊन संजय गाडेतात्या यांचा मान्यवरांनी आपापल्या मनोगतात गौरव केला.यामध्ये प्रा.निरंजन फरांदे, कृष्णा गव्हाळे,किशोर धुमाळ, हृषीकेश गायकवाड, महारुद्र तिकुंडे,रोहन राजेशिर्के, प्रकाश काशीळकर,निलेश मेहंगावकर, मानसिंग खरात, विशाल भोसले, शिवाजी धस्के, प्रशांत उबाळे, राजेंद्र कांबळे, अरुण पवार, चंद्रकांत कांबळे, शिवदास, कारंडे,आशतोष वाघमोडे,व्ही. शंकरराव,प्रशांत भोसले,विशाल कांबळे,दीपक जाधव,दीपक जामदार,लखन गायकवाड,प्रशांत उबाळे,दीपक शिंदे यांनी मनोगत व्यक्त केली. सुभाष मोरे यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केलें.प्रारंभी,डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास संजय गाडे व सहकारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.सदरच्या कार्यक्रमास पक्षातील पदाधिकारी,कार्यकर्ते, गाडे तात्या यांचा परिवार,विविध क्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

*************

# क्षितिज चिमणकर या तरुणाचा प्रामाणिकपणा कौतुकास्पद



**दैनिक जनप्रभात**
**नंदू कोल्हे /प्रतिनिधी**
-------------

**कामठी:-** रविवार दिनांक फेब्रुवारी २०२४ ला सकाळी गोराबाजार माल रोड येथे राहणारी एक युवती आपल्या दुचाकी स्कुटीने कामठी येथे आपल्या ओळखीच्या व्यक्तीला सोडण्यासाठी आली होती.वाहन चालवीत असताना सत्तू हलवाई चौक कसारओली येथे तरुणीची पर्स पडली त्यावेळी पाठीमागून येत असलेल्या क्षितिज चिमणकर या सजग व प्रामाणिक तरुणानी ती पर्स उचलली असता त्या तरुणीचे सुमारे २५०० रुपये रोख व महत्त्वाची कागदपत्रे त्या पर्समध्ये पाहिली पर्स त्यांनी जुना पोलीस स्टेशनचे पीएसआय ठाकूर यांच्याकडे जमा करून प्रामाणिक व जागरूक नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडले त्यानंतर पोलिसांनी कागदपत्राच्या आधारे मुलीची ओळख पटवली आणि तिला पोलीस ठाण्यात बोलवून तिची रोख रक्कम आणि कागदपत्रासह पर्स मुलीला परत केली आपले पर्स पाहून परेशान मुलीच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली.

# २४०० चौरस फुटाच्या भव्य रंगमंचावर होणार जाणता राजाचे सादरीकरण

**दैनिक जनप्रभात**
-------------

**वर्धा, :** सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनाच्यावतीने दि.६,७ व ८ फेब्रुवारी रोजी १७ वर्षाच्या कालावधीनंतर दुसऱ्यांदा देशातील सर्वात मोठे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासुन ते शिवराज्यभिषेकापर्यंतच्या कार्यावर आधारित जाणता राजा महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महानाट्याची प्रशासनाच्यावतीने जय्यत तयारी झाली आहे. स्वावलंबी मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जाणता राजा महानाट्यासाठी २ हजार ४०० चौरस फुटाचा भव्य रंगमंच तयार करण्यात आला असून अतिमहत्वाची, महत्वाची व सामान्य लोकांसाठी वेगवेगळी दालने असलेली ८ हजार २०० आसनाची प्रेक्षक व्यवस्था तयार करण्यात आली आहे. प्रत्येक दालनामध्ये प्रवेशासाठी स्वतंत्र व्यवस्थेसह वाहन तळाची सुध्दा व्यवस्था करण्यात आली आहे.प्रेक्षकांना महानाट्याचा शांततेत परिपूर्ण आनंद लुटता यावा, गर्दी होऊ नये यासाठी सुरक्षात्मक उपाय म्हणुन ११० पोलिस सुरक्षेसाठी तैनात राहणार आहे तसेच शंभराच्यावर स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त करण्यात आलेल्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण सुध्दा देण्यात आले आहे.महानाट्य परिसरात वैद्यकिय मदत, प्रेक्षकांसाठी पॅकिंग खाद्याचे स्टॉल सुध्दा उपलब्ध असणार आहे. महानाट्य पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांनी मोफत उपलब्ध असलेल्या प्रवेशिका घेऊनच महानाट्य सुरु होण्याच्या अर्धातास आधी आसनस्थ व्हावे व महानाट्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# उषाताई वाघमारे यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक जनप्रभात**
**नंदू कोल्हे /प्रतिनिधी**
--------------

**कन्हान : -** श्रीमती हीराबाई उच्च प्राथमिक शाला कन्हान येते श्रीमती उषाताई नरेंद्र वाघमारे यांचा पुण्यतिथी निमित्य उषाहिरा कॉन्वेंट ला पन्नास हजार रूपये, डेस्क बेंच, एल.ए.डी टीवी साऊंड सिस्टिम आणि ड्रम भेट देऊन पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

सोमवार (दि.५) फेब्रुवारी ला श्रीमती हीराबाई उच्च प्राथमिक शाळा कन्हान येथे दिवंगत माजी मुख्याध्यापिका श्रीमती उषाताई नरेंद्र वाघमारे यांचा पुण्यतिथी निमित्य श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सन्देश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री नरेन्द्रजी वाघमारे आणि माजी मुख्याध्यापिका वंदना रामापुरे हयाची प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम श्री नरेन्द्र वाघमारे यांचा हस्ते फोटो चे पुजन करून माल्यार्पण करून भावपुर्ण श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उषाताई वाघमारे यांचा जीवन चरित्रवार श्री नरेन्द्र वाघमारे आणि वरिष्ठ शिक्षकानी आपले विचार प्रगट



केले. याप्रसंगी नरेन्द्रजी वाघमारे यानी उषाहिरा कॉन्वेंट ला पन्नास हजार रूपयाचा चेक आणि डेस्क बेंच, एल.ए.डी टीवी आणि वंदना रामापुरे माजी मुख्या ध्यापिका यानी साऊंड सिस्टिम आणि ड्रम भेट म्हणुन उषाहीरा कान्वेंट ला दिला. कार्यक्रमाचे संचालन नेहा गायधने हयानी तर आभार प्रदर्शन भास्कर सातपुते यानी केले. कार्यक्रमास गणेश रामापुरे अधिक्षक, मंदा किनी रंगारी, जयश्री पवार, कीर्ती वैरागडे, हेमंत वंजारी, गीता वंजारी, अभिषेक मोहनकर, हेमंत वाघमारे सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.






# देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोला काळे फासणे माजी मंत्राच्या पुत्राला चांगलेच भोवले. "भाजपने केला तीव्र निषेध"



**दैनिक जनप्रभात**
**जयश्री मेंघरे / प्रतिनिधी**
-----------

**वैद्य, नागपूर -** देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या फोटोला काळे फासणे माजी मंत्राच्या पुत्राला चांगलेच भोवले .नागपूर जिल्हा परिषद कार्यालय परिसरात देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेला काँग्रेसच्या माजी मंत्राच्या पुत्राने काळ फासण्याचे निंदनीय कृत्य केले. या घटनेच्या निषेधार्थ जिल्हा परिषद नागपूर समोर भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी यांनी घोषणाबाजी करत तीव्र निषेध नोंदविला. यावेळी जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, आमदार प्रवीण दटके, आमदार समीर मेघे , माजी जिल्हाध्यक्ष डॉ. राजू पोतदार अरविंद गजभिये, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, जिल्हा परिषद सदस्य सतीश डोंगरे, पंचायत समिती सभापती नरेंद्र बंधाटे सह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांना अटक करण्यात आली. एका फलकावरील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोला काळे फासण्यात आले हा प्रकार त्यांना चांगलाच भोवला आहे .ते माजी मंत्री नितीन राऊत यांचे चिरंजीव असून काँग्रेसकडून रामटेक लोकसभा निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. शहरातील वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये शासकीय योजनांची बॅनर लावण्यात आले आहे. केंद्राशी संबंधित योजनांच्या बॅनरवर पंतप्रधानांच्या फोटोसह मोदी की गॅरंटी असा उल्लेख आहे. कुणाल राऊत आपल्या समर्थकांसह जिल्हा परिषद मुख्यालयाच्या आवारात पोहोचले तिथे मोदीचे नाव हटवून भारतची स्टिकर लावले. सोबतच फलकावरील मोदीच्या फोटोला काळे फासले. या प्रकारावरून सदर पोलिसांनी अनधिकृतपणे आंदोलन करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याचा गुन्हा दाखल केला ..

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242